महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक १८ मार्च, २०१५ / फाल्गुन २७, १९३६ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री } **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ११४

अंधेरीतील (मुंबई) सनशाईन बिल्डर्स आणि डेव्हलपर्स या विकासकाने एसआरए योजनेसाठी बोगस कागदपत्रे बनवून भारतीय विमान प्राधिकरणाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवलेबाबत

(१) * ३८३० श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरीतील (मुंबई) सनशाईन बिल्डर्स आणि डेव्हलपर्स या विकासकाने गुंदवली येथील महाकाली दर्शन गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर इमारतीच्या बांधकामासाठी बोगस कागदपत्रे बनवून त्या आधारे एसआरए योजनेसाठी भारतीय विमान प्राधिकरणाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळविले. परंतु सदरील कागदपत्रे बोगस असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश पालिकेचे आयुक्त यांनी दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास देऊनही संबंधित अधिकाऱ्यांनी पालिका प्रमुखांच्या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी विकासकांकडून बोगस कागदपत्रे सादर करण्यात आल्यामुळे तेथील झोपडपट्टीवासियांना निवारा मिळण्यात अडचण निर्माण झाल्यामुळे निवारा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी करुन दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणत्या स्वरूपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) मौजे गुंदवली, तालुका अंधेरी न.भू.क्र. ७८ व ७९ या खाजगी मालकीच्या जमिनीवरील महाकाली दर्शन व महाकाली दर्शन-अ या दोन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना सनसाईन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांचेमार्फत राबविण्यात येत आहे. सदर विकासकाने सादर केलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या साईट इलेव्हशन सर्टीफिकेटची भारतीय विमानतळ प्राधिकरणाने भौतिक पडताळणी केली असता त्या प्राधिकरणाने विकासकास दिलेले प्रमाणपत्र विकासकाने दिलेल्या चुकीच्या माहितीवर आधारित असल्याचे आढळल्याने त्या प्राधिकरणाने त्यांचे दिनांक ३०.५.२०११ चे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केल्याचे मे.सनशाईन बिल्डर्स व डेव्हलपर्स यांना दिनांक २०.१०.२०१४ च्या पत्रान्वये कळवून त्या पत्राची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेसह इतर संबंधितांना देखील पाठविली. तसेच भारतीय विमानपतन प्राधिकरण, पश्चिम क्षेत्र मुख्यालयाकडून त्या आशयाचे दिनांक २०.१०.२०१४ रोजीचे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने वरील प्रमाणे कळविल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने दिनांक ३१.१०.२०१४ रोजीच्या पत्रान्वये आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाचे दिनांक २०.१०.२०१४ रोजीचे पत्र आवश्यक कार्यवाहीकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पाठविले आहे.

(३) सद्यस्थितीमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केले आहे. तसेच त्याविषयी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास तक्रार प्राप्त झाल्यामुळे विकासकास काम थांबविण्याच्या सूचना दिनांक १२.१२.२०१४ रोजी दिलेल्या आहेत. ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्याखेरीज या योजनेत बांधण्यात आलेल्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देता येत नाही.

(४), (५) व (६) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अनुषंगाने दिनांक ४.२.२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेसमोर सर्व संबंधितांची सुनावणी घेण्यात आली. त्यामध्ये योजनेच्या विकासकाने भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र ४ महिन्याच्या कालावधीत सादर करावे अन्यथा महानगरपालिकेच्या सर्वेक्षण विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार अनुज्ञेय असलेल्या उंचीवरील मजल्यांच्या निष्कासनाची कारवाई करण्यात येईल, असे निर्देश दिलेले आहेत.

मुंबईतील सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकडे महानगरपालिकेचे होत असलेले दुर्लक्ष

(२) * ३७९२ श्री.विजय गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील फुटपाथ रस्ते, नाले साफ करणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या १३८६ सफाई कर्मचाऱ्यांचा गेल्या सहा वर्षात वेगवेगळया आजारामुळे मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी तासनतास दुर्गंधीच्या संपर्कात असतात म्हणून कर्मचाऱ्यांमध्ये टीबी आणि हृदयविकारासारख्या मोठया आजारांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिका या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांचा मृत्यू तरुण वयातच होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.
(२) घन कचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांना प्रतीदिन सात तासांचा कार्यकाळ असून त्यामुळे त्यांना टीबी आणि हृदयविकारासारख्या मोठया आजारांचे प्रमाण वाढले आहे किंवा कसे याबाबतचा अभ्यास करुन अहवाल देण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयातील डीपार्टमेंट ऑफ चेस्ट मेडीसिन व एनव्हिरॉनमेंट पोल्युशन रिसर्च सेंटर यांच्याकडे महानगरपालिकेमार्फत सोपविण्यात आले आहे. सदरचा अहवाल अद्यापी अप्राप्त आहे.
(३) व (४) हे खरे नाही. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत, कामगारांची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात येते व विविध आजारपणासाठी लागणारा संपूर्ण वैद्यकीय खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात येतो. तसेच कामगाराचे अकस्मात निधन झाल्यास विमा योजनेअंतर्गत रुपये एक लाखाचा विमा त्यांच्या वारसदारास देण्यात येतो. महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी दोन दिवसांचे व कर्मचाऱ्यासाठी तीन दिवसांचे (निवासी) प्रशिक्षण आयोजित केले जाते. या प्रशिक्षणात त्यांना कामाच्या ठिकाणी व्यसनमुक्ती, बचतीचे महत्व, सेवानिवृत्तीनंतरचे फायदे, दैनंदिन आरोग्याचे महत्व, महापालिका कल्याणकारी योजना, आपत्कालिन व्यवस्थापन इत्यादीबाबत प्रबोधन केले जाते.

नाशिक विकास आराखड्यात नगररचना विभागाच्या अधिकाऱ्याकडून झालेली अनियमितता व गैरव्यवहार

(३) * २८१७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११४४ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिकच्या विकास आराखड्यात नगररचना विभागाच्या अधिकाऱ्याकडून झालेली अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी सहसंचालक, नगररचना नाशिक विभाग यांचेमार्फत विद्यमान जमिन वापर नकाशा तपासण्याचे तसचे प्रस्तावीत जमिन वापर नकाशा तयार करण्याचे सुरू असलेले काम पूर्ण झाले आहे काय,
(२) असल्यास, गैरव्यवहार व अनियमिततेप्रकरणी सविस्तर चौकशी पूर्ण होवून या प्रकरणी अद्ययावत अहवाल प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शासनस्तरावरून यासंबंधी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, सदरहू कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) सहसंचालक, नगररचना नाशिक विभाग यांचे मार्फत विद्यमान जमिन वापर नकाशा तपासण्याचे तसेच प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करण्याचे काम सुरु असून अद्याप पुर्ण झालेले नाही. यासाठी सहसंचालक नगररचना नाशिक विभाग यांनी दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून तीन महिन्यांची मुदत अपेक्षिलेली आहे. वरीलप्रमाणे सविस्तर चौकशी पुर्ण होऊन अद्ययावत अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर यासंबंधीची पुढील उचित कार्यवाही करण्याचे योजीले आहे.

नागपूर शहर बस वाहतूक सेवेकरिता मोरभवन हस्ततांतरित करणेबाबत

(४) * २६८९ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर बस वाहतूक सेवेकरिता मोरभवन हस्तांतरित करणेबाबत शासनास पत्र पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्रावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) जनहित याचिका क्रमांक ५७/२०१० मधील आदेशानुसार मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने यासंदर्भात संबंधीतांना उचित सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील नव्याने उभारण्यात आलेल्या शताब्दी रुग्णालयाच्या निकृष्ट बांधकामाबाबत

(५) * ३९९१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील करोडो रुपये खर्च करून नव्याने उभारण्यात आलेल्या शताब्दी रुग्णालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने तेथील भिंतीला तडे गेल्याचे माहे, जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर रुग्णालयाचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही. माहे जानेवारी २०१५ च्या दुस-या सप्ताहात शताब्दी रुग्णालयाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतची कुठलीही घटना घडलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जव्हार (जि.पालघर) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध कामांमध्ये झालेला भ्रष्टाचार

(६) * ४०८८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास या विभागातील एका कनिष्ठ अभियंत्याला ठेकेदाराकडून १० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागात विविध कामांमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरिता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) श्री.सचिन देविदास जाधव, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार,जि.पालघर यांनी तक्रारदार श्री.रशिद शेख यांच्याकडे त्यांनी केलेल्या कामाचे थकीत बिल काढण्यासाठी रु.२०,०००/- लाचेची मागणी करुन तडजोड अंती रु. १०,०००/- लाचेची रक्कम स्विकारली असता, त्यांना दिनांक २३.१२.२०१४ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले. सदर लाचेच्या सापळा प्रकरणी श्री.सचिन देविदास जाधव, कनिष्ठ अभियंता यांचेविरुध्द जव्हार पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१२/२०१४ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) सह १३ (२) अन्वये दिनांक २३.१२.२०१४ रोजी दाखल करण्यात येवून, त्यांना त्याच दिवशी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. आरोपीस न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने त्यांना दिनांक २७.१२.२०१४ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करुन त्यानंतर त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे.

आरोपी लोकसेवक श्री.सचिन देविदास जाधव यांना दिनांक ०५.०१.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे. तसेच जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागात विविध कामांमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी जनजागृती करुन भ्रष्टाचारासंबंधी तक्रारी असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, पालघर किंवा ठाणे कार्यालयास देण्याबाबत कॉनर सभा, बॅनर्स, पत्रके इत्यादीचे वाटप करुन जनजागृती करण्यात आली आहे. तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात टोल फ्रि क्र. १०६४ सुरु करण्यात आला आहे.

अकोला येथील विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्ताराबाबत

(७) * २९११ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टीने अकोला येथे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तारीकरणासाठी जिल्हाधिकारी, अकोला यांनी एकूण ७९.८२ हे. जमिनीचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ आणि दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१२ रोजी पाठविलेला असून सदर प्रस्तावाची छाननी शासन स्तरावरुन पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाबाबत सर्व शासकिय स्तरावरुन प्रशासकीय मान्यता असून शासनाकडून ५ कोटीचा पहिला हप्ता प्राप्त होऊनही विस्तारीकरणास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व उक्त विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचे काम सर्वसाधारणपणे केव्हा पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंशत: खरे आहे.

विमानतळ विस्तारीकरणासाठी एकूण ९४.७४ हे. जमिनीची आवश्यकता आहे.

(२), (३) व (४) सदर विमानतळाच्या विस्तारीकरणाकरिता डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ६०.६८ हे. जमीन आवश्यक असून या जमिनीवर अस्तीत्वात असलेल्या प्रशासकीय व अन्य इमारती संशोधन केंद्र, शरद सरोवर व अन्य पाण्याचे स्त्रोत यांचे मुल्यांकनाची रक्कम रु. ५.६४ कोटी विद्यापीठास अदा करण्यात आली आहे.

या विस्तारीकरण प्रकल्पाविरुध्द मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे जनहित याचिका क्र.२२/२०१४ दाखल करण्यात आली असुन त्यात दिनांक २३.४.२०१४ रोजी झालेल्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने स्थगनादेश दिले असल्यामुळे विस्तारीकरणाबाबत पुढील कार्यवाही करता आली नाही. या संदर्भात राज्य शासनाव्दारे मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करुन स्थनगादेया दुर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

पुणे शहरातील जलशुद्धीकरण केंद्रास केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होत नसल्याबाबत

(८) * ३४०९ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भामा आसखेड योजना व वडगाव बुद्रुक येथील जलशुध्दीकरण योजनेला केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होणार नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील पर्वती जलशुद्धीकरण केंद्रासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत मंजूर झालेला निधी व सदर योजनेस केंद्र शासनाने स्थगिती दिली असल्याने पुणे शहराचा पाणी प्रश्न सोडविण्यास अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले, तद्नुसार केंद्र शासनाकडून उपरोक्त दोन जलशुध्दीकरण योजना व जलशुध्दीकरण केंद्रासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

जेएनएनयुआरएम योजनेच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये भामा आसखेड पाणीपुरवठा योजना व वडगाव बुद्रुक जलशुध्दीकरण केंद्र उभारणेसाठी प्रकल्प मंजूर झालेला असून केंद्र व राज्य शासनाकडून पहिल्या हप्त्याचा निधी पुणे महानगरपालिकेस वितरीत करण्यात आला आहे. जेएनएनयुआरएम (ट्रांझिशन फेज) योजनेचा कालावधी हा मार्च २०१७ पर्यंत असून त्या अनुषंगाने केंद्र शासनाचा हिश्याचा व राज्य शासनाचा उर्वरीत निधी अनुज्ञेय राहिल.
(२) पुणे येथील पर्वती जलशुध्दीकरण प्रकल्पास केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय मान्यता व नियंत्रण समितीने शिफारस केली होती तथापि वित्तीय अनुपलब्धतेमुळे प्रकल्प केंद्र शासनाकडून अमान्य करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिका आपल्या स्वत:च्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून पर्वती जलशुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित करीत आहे.
(३) व (४) प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही. प्रश्न भाग-०२ च्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपूरावा वरिष्ठ स्तरावरुन करण्यात आला होता तथापि केंद्र शासनाने मंजूर केलेल्या पर्वती जलशुध्दीकरण प्रकल्पास मार्च २०१४ अखेर निधी वितरीत न झाल्याने सदर प्रकल्प नामंजूर केला असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाड्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांवर झालेला अन्याय

(९) * ४१३० प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील किती पदवीधर अंशकालीन उमेदवारांना नोकरी मिळाली नाही याची यादी निश्चित करण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार रोजगार व स्वंयरोजगार मंत्रालयाने याबाबत दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास काढलेल्या आदेशानुसार सर्व विभागीय कार्यालयांना पत्र पाठवले परंतू त्या पत्रातून मराठवाडयाला वगळण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार इतर सर्वच विभागातील जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रानी संबंधित अंशकालीन उमेदवारांशी पत्रव्यवहाराव्दारे कळविण्यात आले परंतू मराठवाडयातील अंशकालीन पदवीधर उमेदवारांना असे न कळविल्यामुळे त्यांची नावे शासनापर्यंत न गेल्याने नोकरी अभावी उक्त कर्मचाऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मराठवाडयातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ देताना ईश्वर मला सहाय्य करो अशा उल्लेखाची सक्ती केल्याबाबत

(१०) * ३३९३ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ देताना ईश्वर मला सहाय्य करो अशा उल्लेखाची सक्ती करण्याने संविधानाच्या मूलभूत उद्देशांना तडा गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती व कारणे काय आहेत,

(३) याबाबत शासनाने या आधी घेतलेला निर्णय मागे घेण्याची कार्यवाही केली आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही. शासकीय कर्मचाऱ्यांना शपथ घ्यावयाची नसल्यास त्यांना गांभीर्यपूर्वक दृढकथन करण्याची मूभा आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य सरकारने मंजूर केलेल्या डी.पी.आर.बाबत

(११) * ३१९९ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये मेट्रो प्रकल्पास पुणे महानगरपालिकेने व राज्य सरकारने मंजूर केलेल्या डी.पी.आर. प्रमाणे केंद्र सरकारने या प्रकल्पास तत्वत: मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता शासनाने केंद्र सरकारकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) राज्यशासनाने सदर प्रकल्पास मान्यता देऊन केंद्रशासनास सादर केलेल्या पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट व वनाज ते रामवाडी या मार्गिकांच्या प्रस्तावास केंद्रशासनाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या पत्रान्वये तत्वतः मान्यता दिली असून सदर मान्यतेच्या अनुषंगाने व केंद्रशासनाने वेळोवेळी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने राज्यशासनाने केंद्रशासनास अहवाल सादर केले आहेत. अंतिमतः सदर प्रकल्पाच्या मान्यतेसाठी केंद्रीय शहर विकास मंत्रालयाच्या स्तरावर प्री-पीआयबी (Public Investment Board) च्या झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने केंद्रशासनास दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये राज्यशासनाने केंद्रशासनास आक्षेपांची उत्तरे सादर केली आहेत. सदर प्रकल्पातील मार्गिकांबाबत मा. लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था व स्थानिक नागरिक यांनी दाखल केलेल्या सूचना व हरकतीच्या अनुषंगाने पुणे येथे बैठक घेऊन पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकेचा प्रस्ताव शासनाने मंजूर केल्याप्रमाणे राबविण्याबाबत व वनाज ते रामवाडी या मार्गिकेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा अभ्यास करुन शासनास अहवाल देण्यासाठी मा. पालक मंत्री, पुणे जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वर्धा जिल्ह्यात अवैधपणे सुरू असलेली दारुविक्री बंद करण्याबाबत

(१२) * ३०३३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यात शासकीय स्तरावर दारुबंदी असली तरी अवैधपणे दारुविक्री सुरुच असून गावातील १७५ दारुचे अवैध धंदे बंद करावेत या मागणीसाठी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान महिला व विद्यार्थी यांनी रस्त्यावर येऊन मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात छुप्या पध्दतीने अवैधरित्या दारु विक्री करणाऱ्यावर शासन कोणती पाऊले उचलणार आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

(२) व (३) छुप्या पध्दतीने अवैध दारु विक्री करणा-या विक्रेत्याकडे छापे टाकून दारुबंदी कायद्यान्वये कार्यवाही केली जाते. त्याशिवाय अवैध दारु विक्रीचा व्यवसाय करणारे यांचेवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन दारुचे समुळ उच्चाटन होणेकरिता कार्यवाही करण्यात येते. दारु विक्रेत्यांवर छापे टाकण्यासाठी जिल्हा स्तरावर व उप विभागांतर्गत विशेष पथके नेमण्यात आली असून त्याद्वारे कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरातील गुप्तहेर एजन्सीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

(१३) * ३२८३ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात आज अनेक डिटेक्टीव्ह एजन्सी कार्यरत आहेत, पाळत ठेवण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा त्यांच्याकडे कार्यरत असते, इंडियन टेलिग्राफ ॲक्ट अंतर्गत बंदी असलेली अनेक उपकरणे या एजन्सी सर्रास वापरताना दिसतात, बऱ्याचदा पाळत ठेवल्यानंतर मिळालेल्या माहितीचा त्या व्यक्तींना ब्लॅकमेलींग करण्यासाठी वापर केला जातो, अशा डिटेक्टीव्ह एजन्सीसाठी शासनाने कोणतेही निकष ठरविलेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन अशा गुप्तहेर एजन्सीवर नियंत्रण ठेवण्याकरीता काही नियमावली लागू करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) इंडियन टेलिग्राफ ॲक्ट अंतर्गत बंदी असलेली उपकरणे डिटेक्टीव्ह एजन्सी वापरत असल्याचे आढळून आलेले नाही.

(२), (३) व (४) असे प्रकार आढळून आल्यास शासनामार्फत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

रायगड जिल्ह्यात वाळीत टाकण्यात आलेल्या प्रकरणांवर कारवाई करण्याबाबत

(१४) * २६४३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात वाळीत टाकण्याची जवळपास ४६ प्रकरणे झाल्याची माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी किती प्रकरणात गुन्हे दाखल झाले असून, किती जणांवर कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी जवळपास १७ प्रकरणे राज्य सरकारच्या गृह विभागाकडे दोषारोप पत्र दाखल करण्याच्या मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणे मंजूरीसाठी प्रलंबित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच प्रशासन या बाबतीत उदासीन असून त्यांनी या विषयी वेळीच दखल घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(५) तसेच शासनाने याबाबत चौकशी करुन सदर प्रकरणे निकाली काढण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) रायगड जिल्ह्यात सामाजिक बहिष्काराबाबत माहे जानेवारी, २०१५ पर्यंत एकूण ३४ प्रकरणांत गुन्हे दाखल केले आहेत.
(२), (३), (४) व (५) त्यापैकी २८ प्रकरणातील आरोपींविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार संबंधित न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. उर्वरित ६ प्रकरणांबाबत पुढील तपास सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

ठाण्यातील नौपाडा येथील भूखंड टिका नं.१२, सिटी सर्व्हे नं.१६६ हा भूखंड समाजोपयोगी कामांसाठी उपलब्ध करून देणेबाबत

(१५) * ३५४७ ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नौपाडा, ठाणे येथील भूखंड टिका नं.१२, सिटी सर्व्हे नं.१६६ या भूखंडावरील प्रसुतीगृह व दवाखान्याकरिता परिशिष्ट पी नुसार विकसित करण्यात आलेल्या आरक्षणाखालील तळ+२ मजल्यांचे बांधकाम अभ्यासिका, पाळणाघर व वृद्धाश्रम या सारख्या समाजोपयोगी कामासाठी उपलब्ध करून देण्याकरिता वापरातील बदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेकडून शासनाच्या मान्यतेसाठी दिनांक ४ जुलै, २०११ व त्यानंतर दिनांक १७ जून, २०१३ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी ३ वर्षापेक्षाही अधिक कालावधी होऊनसुद्धा शासनाकडून सदरहू प्रस्तावास अद्याप अंतिम मान्यता देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी अंतिम मान्यता देण्यास अडचण काय आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) सहायक संचालक, नगर रचना, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक १६/११/२०१० च्या पत्रान्वये टिका नं. १२, सिसन. १६६, नौपाडा या भूखंडावरील प्रसुतिगृह व दवाखान्याकरीता परिशिष्ट-पी नुसार विकसित करण्यात आलेल्या आरक्षणाखालील तळ + २ मजल्याचे बांधकाम वापरातील बदला संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा फेरबदल प्रस्ताव शासनास मंजूरीकरीता सादर केला आहे. मात्र मंत्रालयास दिनांक २१/६/२०१२ रोजी लागलेल्या आगीमध्ये उपरोक्त प्रस्ताव नष्ट झालेला असल्याने महानगरपालिकेने पुन्हा दिनांक १७/६/२०१३ रोजी या प्रकरणाच्या कागदपत्रांची पुनर्बांधणी नस्ती शासनास पाठवून प्रस्ताव मान्यत करण्याची विनंती केली आहे. सदरच्या प्रस्तावावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता, ते प्राप्त झाले असुन, सदर प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

येवला शहरातील ९९ विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

(१६) * ३४७६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला शहरातील सि.स.नं. ३८०७/३८०८ आणि ३९०७/३९०८ मधील ९९ विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी येवला नगरपरिषदेने दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विस्थापित व्यावसायीकांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत सदर प्रस्ताव मंजुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा-देवळाई (जि.औरंगाबाद) नगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्याबाबत

(१७) * ३९४७ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद परिसरातील सातारा-देवळाई नगरपालिका क्षेत्रातील ३१८ अनधिकृत बांधकामे / इमारती पाडण्याची कारवाई सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही बांधकाम व्यावसायिक न्यायालयात गेल्याने इमारती पाडण्यास न्यायालयाने स्थगिती आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत इमारतीत सामान्य नागरिकांनी घरे घेतलेली असल्याने व त्यावर नगरपालिका प्रशासनाने कारवाई केल्यामुळे, सामान्य नागरिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यापूर्वी राज्यातील काही शहरात अनधिकृत बांधकामे नियमित केले असल्याने तशाच प्रकारची कार्यवाही येथील बांधकामाबाबत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंशतः खरे आहे. सातारा - देवळाई नगरपरिषद हद्दीतील ३२६ अनधिकृत बांधकामे / इमारतींना नोटीसा देण्यात आल्या असून त्यापैकी ५७ इमारतींची अनधिकृत बांधकामे पाडण्यात आलेली आहेत.

(२) अनधिकृत बांधकामांना नोटीस दिलेल्या व्यावसायिकांपैकी एकूण ७७ व्यवसायिकांनी न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत त्यापैकी १६ प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे, कल्याण, डोंबिवली, नालासोपारा, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर आणि अंबरनाथ या भागामधील वाहतूकींची कोंडी सोडविण्याबाबत

(१८) * २८५३ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण, डोंबिवली, नालासोपारा, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर आणि अंबरनाथ या भागामधील वाहतूकींची कोंडी सोडविण्याकरिता एमएमआरडीए मार्फत कल्याण-खोपोली लिंक रोड, नालासोपारा उड्डाणपूल, कापूरबावडी उड्डाणपूल, डोंबिवली ते नाशिक भिवंडी बायपास लिंक, खाडी पूल आणि रस्ता (मानकोली मोटागाव लिंक) ठाणे शहरातील एल.बी.एस. रोडवरील तीन उड्डाणपूल, घोडबंदरला सर्व्हिस रोड आदि प्रकल्प हाती घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदरचे प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्याचे शासनास अपेक्षित आहे व या प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) सदर प्रकल्पांकरिता करण्यात आलेल्या निधीची तरतुद, प्रकल्प पूर्णत्वाची अपेक्षित कालावधी व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

कामाचे नांव	**निधीची तरतूद (रुपये कोटीत)**	**प्रकल्प पूर्णत्वाचा अपेक्षित कालावधी**	**सद्यस्थिती**
कल्याण - खोपोली लिंक रोड (कल्याण - बदलापूर - कर्जत - हाळफाटा रा.म.क्र. ३५ व कर्जत ते चौक रा.म. क्र. ३८ या रस्त्याच्या चौपदरीकरण व सुधारणा करणे)	३३५.५८	एप्रिल, २०१५	८०% काम पूर्ण
नालासोपारा उड्डाणपुल वसई रेल्वे उड्डाणपुल, नायगांव रेल्वे उड्डाणपुल	३७.९५ १२५	मार्च, २०१५ जून, २०१६	९०% काम पूर्ण ५% काम पूर्ण
कापुरबावडी उड्डाणपुल	१९७.४६	मार्च, २०१५	९५% काम पूर्ण
डोंबिवली ते नाशिक भिवंडी बायपास लिंक, खाडी पूल आणि रस्ता, मानकोली मोटागाव लिंक (माणकोली - मोटागांव रस्त्यावर मोटागांव येथे उल्हासखाडीवर ६ पदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे) -	२४५	डिसेंबर, २०१८	प्रथम टप्प्यातील निविदा कार्यवाही प्रगतीपथावर
ठाणे शहरातील एल.बी.एस. रोडवरील तीन उड्डणपूल	२०८	ऑक्टोबर, २०१६	निविदा मंजूरी प्रक्रिया प्रगतीपथावर
घोडबंदर सर्व्हिस रोड	९४	नोव्हेंबर, २०१५	५०% काम पूर्ण

पुणे शहराचा तसेच पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या गावांचा विकास आराखडा त्वरीत मंजूर करणेबाबत

(१९) * ३६९४ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराचा तसेच पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या गावांचा विकास आराखडा मंजूर करण्याची मागणी वांरवार करण्यात येवूनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहराचा व महापालिकमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या गावांचा विकास आराखडा त्वरीत मंजूर होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) पुणे शहराच्या मूळ हद्दीची विकास योजना सुधारित करुन प्रारुप सुधारित विकास योजना पुणे महानगरपालिकेने दिनांक २८/०३/२०१३ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द केलेली आहे. सदरचे प्रारुप सुधारित विकास योजना कलम ३० अन्वये अद्याप महानगरपालिकेकडून शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे सद्यस्थितीत शासनाने मंजूरी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील बायो डायव्हर्सिटी पार्क (बी.डी.पी.) आरक्षणाचा भाग वगळून उर्वरित विकास योजनेस शासनाने यापूर्वीच मंजूरी दिलेली आहे. बी.डी.पी.बाबत दिनांक २८/०२/२०१३ रोजी प्रसिध्द सूचनेच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांचे अहवाल शासनाकडे प्राप्त झाले असून त्यांची छाननी सुरु आहे.

वडाळा (मुंबई) येथील बॉम्बे डाईंग मिलने प्राधिकरणास दिलेल्या जागेवर गिरणी कामगारांसाठी गृह प्रकल्प राबविण्याबाबत

(२०) * ३५५९ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांच्या घरांसाठी बॉम्बे डाईंग मिलने म्हाडाच्या वाट्याची वडाळयातील ३३ हजार ८२२ चौरस मीटरची जागा प्राधिकरणाला माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात हस्तांतरीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेत गिरणी कामागारांसाठी गृह प्रकल्प राबविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) व (२) बॉम्बे डाईंग मिलकडून त्यांच्या गिरणीतील कामगारांसाठी व संक्रमण शिबिरांसाठी म्हाडास ३३८२२.८९ चौ.मी क्षेत्रफळाची जागा दिनांक ०९.१२.२०१४ रोजी प्राप्त झाली आहे.

ताबा घेण्यात आलेल्या जमिनीची अधिक्षक, नगर भुमापन व भुमी अभिलेख (शहर) यांचे प्रतिनिधी व बॉम्बे डाईंगचे संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत दिनांक २२ व २३/०१/२०१५ रोजी आगाऊ मोजणी करण्यात आली. सदरहू जमिनीवर संबंधित गिरणी कामगारांसाठी सदनिका व संक्रमण शिबिर गाळे बांधण्याची योजना प्रस्तावित असून सदरच्या योजनेचे अभिन्यास व इमारतीचे नकाशे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मान्यतेस्तव सादर केले आहेत. सदर योजनेनुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्राप्त झालेल्या भुखंडावर गिरणी कामगारांसाठी ३६९६ गाळे व संक्रमण शिबिरासाठी १४४० गाळे असे एकूण ५१३६ गाळे प्रस्तावित आहेत. मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित नकाशांना मंजुरी दिल्यानंतर मंडळामार्फत योग्य प्रक्रिया पुर्ण करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोथे (ता.माण, जि.सातारा) येथील डोंगर पठारावर असणारे कडे फोडून खडी तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जिलेटीन साठ्याचा स्फोट झाल्याबाबत

(२१) * ३८७२ श्री.जयंत पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोथे (ता.माण, जि.सातारा) येथील डोंगर पठारावर क्युटन एनर्जी कंपनीच्या जवळपास १०० पवनचक्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या डोंगर पठारावर असणारे कडे जिलेटीनच्या मदतीने फोडून त्यापासून खडी तयार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिलेटीनच्या कांड्या ठेवण्यात आलेल्या शेडच्या परिसरात दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्फोट होवून झालेल्या जीवीत हानीमध्ये तीनजण जागीच मृत्यूमुखी पडले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने दखल घेऊन पुढील कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, मौ.बोथे, ता.माण, जिल्हा सातारा या गावाच्या हद्दीतील डोंगर पठारावर मे.बोथे विंड फार्म डेव्हलपमेंट प्रा.लि.या गुंतवणूकदारांच्या ३३ पवनचक्या आहेत.
(२) होय.

(३) होय, जिलेटीनच्या कांडया ठेवण्यात आलेल्या शेडच्या परिसरात दिनांक ९/१/२०१५ रोजी स्फोट होवून ३ जणांचा मृत्यू झाला असून ४ जण जखमी झाले आहेत.

(४) सदर प्रकरणी चौकशी केली असून एकूण १५ आरोपींविरुध्द दहिवडी पोलीस ठाणे गु.र.नं. ६/२०१५, भा.द.वि.कलम ३०४, ३३७, ३३८, २८६, ४२७, ३४ सह भारतीय स्फोटक कायदा कलम ३ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यात निष्पन्न झालेल्या आरोपींपैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. ७ आरोपींना मा.उच्च न्यायालयाकडून तात्पुरता जामीन मंजूर केलेला आहे. ४ आरोपी फरारी आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

जिल्हादंडाधिकारी, सातारा कार्यालयाकडून मृत व्यक्तींच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलडाणा) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम बंद असल्याबाबत

(२२) * ४०४६ श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव, (जि.बुलडाणा) शहरासाठी कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना सन २००८-२००९ मध्ये मंजुर झाली आहे हे खरे आहे काय, सदर निवीदा सी.एस.आर.पेक्षा किती टक्केवर देण्यात आले व त्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, या योजनेसाठी किती निधी प्राप्त झाला, व किती काम पूर्ण झाले व किती बिले कंत्राटदाराला वितरीत करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, सदर काम बंद असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, विलंब करणाऱ्या कंत्राटदारावर शासन कडक कारवाई करणार आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) केंद्र शासनाने सन २००८-०९ मध्ये खामगांव शहराच्या पाणी पुरवठा योजनेच्या रुपये ४३.२८ कोटी किंमतीच्या प्रकल्पास मंजूरी दिलेली आहे. हे खरे आहे.

खामगांव शहर पाणी पुरवठा योजना सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार तयार करुन केंद्र शासनाकडे युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत मंजूरीसाठी पाठविण्यात आली होती. केंद्र शासनाने सदर योजना सन २००८-०९ मध्ये मंजूर केलेली आहे. त्यानुसार सन २००६-०७ च्या दरसूचीप्रमाणे ५३.४४ टक्के जादा दराने तर सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार ९.१३ टक्के जादा दराने न्यूनतम दराची निविदा खामगांव नगरपरिषदेमार्फत मंजूर करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकल्पासाठी केंद्र शासन हिस्सा रुपये ३४.६२ कोटी, राज्य शासन हिस्सा रुपये ४.३२ कोटी व राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे वाढीव दरसूचीतील फरकाच्या ५० टक्के रक्कम रुपये ५.७१ कोटी पूरक अनुदान म्हणून असा एकूण रुपये ४४.६५ कोटी निधी खामगांव नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे. खामगांव नगरपरिषदेच्या अहवालानुसार प्रकल्पांतर्गत मंजूर १३ उपांगांपैकी ७० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत.

सदर प्रकल्पाच्या कामापोटी कंत्राटदाराला रक्कम रुपये ४६.७० कोटी वितरीत करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकल्पांतर्गत मंजूर जलशुद्धीकरण केंद्रासाठी शासकिय ई-क्लास जागेचा ताबा महसूल विभागाकडून प्राप्त झाला नसल्याने कंत्राटदाराकडून दरवाढ मागणी होत असल्याने या कारणास्तव मागील २ महिन्यापासून काम बंद आहे.

(४) त्याअनुषंगाने खामगांव नगरपरिषदेमार्फत कंत्राटदार कंपनीची बँक गॅरंटी गोठवून ठेवण्यात आली असून खामगांव नगरपरिषदेमार्फत कंत्राटदारास सक्त ताकीद व नोटीस देण्यात आली आहे. कंत्राटदाराने तात्काळ काम सुरू न केल्यास कडक कार्यवाही करण्याचा निर्णय खामगांव नगरपरिषदेने ठरावान्वये घेतला आहे.

पोलिस शिपायांनी सुट्टीच्या दिवशी काम केल्यास एक दिवसाचा पगार देण्याबाबत

(२३) * ३४५५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार कायद्यानुसार आठ तास काम केल्यानंतर एक दिवसाचा पगार देण्याची तरतूद असताना पोलिस शिपायांना मात्र सुट्टीच्या दिवशी काम केल्यानंतर फक्त ६८ रुपये भत्ता दिला जात असल्याचे माहे, जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त मानधन हे अत्यल्प असल्यामुळे पोलीस शिपायांनी हे मानधन पोलीस महासंचालकाकडे परत पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने पोलिस शिपायांनी सुट्टीच्या दिवशी काम केल्यास एक दिवसाचा पगार देण्याबाबत किंवा उक्त भत्यामध्ये वाढ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पोलीस शिपायांनी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी कर्तव्य केल्यास त्यांना गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २० जुलै, २००४ अन्वये वेतनमर्यादेनुसार भत्ता दिला जातो.

(२) श्री.विश्वनाथ गोपाळराव नामपल्ले, पोलीस शिपाई, नांदेड यांना मिळणारे मानधन शासनाच्या खाती जमा करुन याची एक पावती त्यांना देण्याबाबतचा अर्ज पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविला आहे.

(३) व (४) पोलीसांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात द्यावयाच्या दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

ठाणे जिल्ह्यातील मिरा रोड परिसरातील नया नगर पोलीस ठाण्याला जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

(२४) * ३०११ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा रोड परिसरातील नागरिकांना नव्याने मंजूर झालेले नया नगर पोलीस ठाण्याला जागा मिळाली नसल्याने सहा महिने उलटूनही स्थापित झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नयानगर पोलीस ठाण्याला त्वरीत जागा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय.

(३) व (४) मौजे भाईंदर, स.क्र.१०४ पै., १०५ पै., (नविन) ४९६ पै., ४८२ पै. (जुना) या आरक्षित क्षेत्राच्या २० टक्के बांधीव क्षेत्रावर मालकी हक्क पोलीस विभागाचा राहील असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर जागेचे भूसंपादनासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

मुंबईतील पवई येथील साकी विहार रोडवर असलेल्या रेनीसन्स हॉटेलच्या मालकांनी केलेली अनधिकृत बांधकामे

(२५) * ३४८९ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.अनिल परब, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई तलाव परिसरातील फिल्टरपाडा येथील साकी विहार रोडवर असलेल्या रेनीसन्स या हॉटेलच्या मालकांनी पवई तलाव परिसरात काही अनधिकृत तसेच वाढीव बांधकामे करून सदर हॉटेलमधील मलजल पवई तलावात सोडले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सन २००९ मध्ये तत्कालिन स्थानिक नगरसेवक यांनी सदर बाब महापालिकेच्या निदर्शनास आणूनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हॉटेलकरिता मुंबई महापालिकेने काही जागा भाड्याने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय निदर्शनास आले,

(५) तद्नुसार, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ अंतगर्त कलम २५ व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियमावली १९६१ च्या नियम २० (१) (२) (बी), (४) व नियम २० (५) मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी हॉटेल मालकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही. साकी विहार रोडवर असलेल्या रेनीसन्स हॉटेलच्या मालकांनी पवई तलाव परिसरात अनधिकृत तसेच वाढीव बांधकामे करुन सदर हॉटेलमधील मलजल पवई तलावात सोडले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले नाही.

(२) सन २००९ मध्ये तत्कालिन स्थानिक नगरसेवक यांनी महानगरपालिकेच्या सभेत सदर बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर, रेनीसन्स हॉटेलची पाहणी केली असता, सदर इमारतीला मंजुरी दिल्याचे आढळून आले व तेथे अनधिकृत बांधकाम आढळून आले नाही.

(३) व (४) सदर हॉटेलाकरिता मुंबई महानगरपालिकेने जागा भाडयाने दिलेली नाही. तथापि, सदर हॉटेलास मुख्य रस्त्यापासून जाण्यासाठी वहिवाटीच्या रस्त्याकरिता ६.२० मी. X ५५०.०० मी. जागेच्या तात्पुरत्या वापराच्या परवान्याचे नुतनीकरण दिनांक ०३.०२.२०१५ पर्यंत करण्यात आले आहे. सदर जागेच्या परवान्याचे दिनांक ०३.०२.२०१६ पर्यंत नुतीनकरण करण्याबाबतचा अर्ज सदर हॉटेलमार्फत प्राप्त झाला असून, सदर जागा लीव ऍन्ड लायसन्स तत्त्वावर प्रत्येक वर्षी शुल्क भरणे यासापेक्ष दिलेली आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ निरिक्षक दुकाने व आस्थापना या विभागामार्फत दिनांक २१.०९.२०१३ रोजी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियमावली १९६१ अनुसार काही तरतुदींचे उल्लंघन केल्याचे आढळुन आल्यामुळे रेनीसन्स हॉटलच्या व्यवस्थापना विरुध्द मा.न्यायालयीन आदेशानुसार रु. १,४४,०००/- एवढया दंडात्मक शिक्षेची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच पुन्हा चॅलेट हॉटेल्स प्रा.लि. यांच्या रेनिसन्स स्पा व आरो हेड ॲन्ड ब्युटी या आस्थापनांवर महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम कलम ७ (१), १८(१ बी) आणि महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियमावलीच्या नियम २० ए अन्वये दिनांक १५.०९.२०१४ रोजी सदर तरतुदींचा भंग केल्यामुळे कारवाई करण्यात आलेली असून त्यानंतर संबंधितांवर मुलुंड येथील महानगर दंडाधिकारी न्यायालयात क्र. १५८७/२०१४ व १५८८/२०१४ अन्वये दावे दाखल करण्यात आलेले आहेत व सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ महानगरपालिका व नगरपालिका हद्दीत निर्माण होणा-या घनकच-याची विल्हेवाट लावण्याबाबत

(२६) * २७२३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर आणि अंबरनाथ या महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील दैनंदिन निर्माण होणा-या घनकच-यांची विल्हेवाट लावण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. ने "प्रादेशिक एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प" तळोजा येथे उभारण्याचे निश्चित केले असून, गेल्या पाच वर्षापासून सदरहू प्रकल्पाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू प्रकल्पास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) घनकचरा व्यवस्थापन हा एक मोठा प्रश्न ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका व नगरपालिकापुढे असून, शहरातील घनकच-यावर योग्य प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्यात येत नसल्यामुळे डंपिंग ग्राउंडवरील कच-यातील धूर व दुर्गंधीचा प्रचंड त्रास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत असून, त्यांच्या आरोग्याच्याही गंभीर समस्या निर्माण झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू महानगरपालिका व नगरपालिकातील कचरा समस्या तातडीने दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२), (३) व (४) नागरी घनकच-याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्रातील ठाणे, भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या ६ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तळोजा येथे प्रादेशिक एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यास प्रवर्तकास कार्यादेश दिला आहे.तळोजा प्रकल्पात सहभागी होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याचे दर्शवून टिपिंग फी दरामध्ये ५० टक्के पर्यंत प्राधिकरणाकडून अर्थसहाय्य अपेक्षिले होते. त्यावर प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चा केल्यानंतर सदर घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या निविदा रद्द करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतला. त्याचप्रमाणे प्रवर्तकास व स्थानिक स्वराज्य संस्थांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कळविण्यात आले आहे. तळोजा येथील घनकचरा व्यवस्थापनबाबत दिनांक १०.२.२०१५ रोजी सचिव, नगर विकास-२ यांच्या स्तरावर बैठक घेऊन सदर बैठकीत मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका व नगरपरिषदांनी तळोजा येथील सामाईक भराव भूमी प्रकल्पामध्ये सहभागी होण्यास तयार असल्याबाबत व त्यासाठी आवश्यक असलेली टिपींग फी भरण्याची तयारी असल्याबाबतचा महासभेचा ठराव घेऊन सहमती कळविण्यात यावी, असे ठरले. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या प्रकल्पाची पुनर्रचना करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा, असा निर्णय घेण्यात आला.

नागपूर महानगरपालिकेतील अतिरिक्त शिक्षकांना पूर्ववत शिक्षकांचे काम देण्याबाबत

(२७) * ३८५७ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेमध्ये १०० शिक्षक अतिरिक्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त झालेल्या शिक्षकांना महानगरपालिकेच्या कर विभागात काम करण्यास पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पदवीधर डीएड, बीएड असणा-या शिक्षकांची गैरसोय होवून त्यांच्यावर नको ते काम महानगरपालिका देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अतिरिक्त शिक्षकांना पूर्ववत शिक्षकांचे काम परत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय. शिक्षण हक्क कायदा २००९ मध्ये ठरवून दिलेल्या निकषानुसार केलेल्या संच निश्चितीप्रमाणे १०० शिक्षक अतिरिक्त झाले आहेत.
(२) होय.
(३) शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना महानगरपालिका ठराव क्र.१४९ दिनांक २२/१/२००८ च्या धोरणात्मक निर्णयानुसार महानगरपालिकेच्या अन्य विभागात रिक्त असलेल्या अतांत्रिक स्वरुपाच्या व सहज सोपे कामकाज असलेल्या जागांवर तात्पुरत्या स्वरुपात समायोजीत केले आहे. भविष्यात पटसंख्येत वाढ झाल्यास व शाळेमध्ये शिक्षकांची गरज भासल्यास या शिक्षकांना कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यास महानगरपालिका सक्षम आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिका नागपूर कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने, शासनास्तरावरुन कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विठ्ठल मंदिराची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याबाबत

(२८) * ३७१५ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विठ्ठल मंदिराची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार विठ्ठल मंदिराच्या शिखराची व आवश्यक असलेली इतर सर्वच दुरुस्ती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

तथापि, पंढरपूर येथील श्रीविठ्ठल मंदिर हे खूप पुरातन मंदिर आहे. काळाचे औघात तसेच नैसर्गिक व मानवनिर्मित कारणामुळे त्यामध्ये काही बदल झालेले आहेत.

(२) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेशानुसार पाहणी करण्यात आलेली आहे.

(३) नामवंत पुरातत्वात तसेच स्ट्रक्चरल व सिव्हील इंजिनिअरींग कन्सल्टंट आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि.सोलापूर यांच्यामार्फत पाहणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्यावतीने काही दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच अधिक्षक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग, मुंबई यांच्यामार्फत काही दुरुस्तीची कामे करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेतील गैरव्यवहार रोखण्याबाबत

(२९) * ३९६१ श्री.राजेंद्र मुळक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत बांधकाम परवाना व वापर परवानासाठी विकासकाकडून विविध प्रकारे टक्केवारी रुपाने रक्कम घेण्यात येत असल्यामुळे विकासक या रक्कमेची भरपाई करण्यासाठी घरांच्या किंमती वाढवितात तसेच अनेकदा बांधकामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात सुरु असलेला भ्रष्टाचार रोखण्याबाबत तसेच विकासकाकडून होत असलेले घरांचे निष्कृष्ट काम थांबवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात १३८ ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत

(३०) * २९८२ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका लगतच्या २७ आणि भिवंडी परिसरातील ६० गावे असे एकूण ८७ गावांच्या प्रारुप विकास आराखड्याला शासनाने मंजूरी देऊन नगर परिषदेचा दर्जा दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील आरक्षित जागा, ग्रीन झोन आणि खाडीमध्ये भराव टाकून बांधलेली अनधिकृत गोदामे व बांधकामांबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) तसेच राज्यातील १३८ ग्रामपंचायतींना नगर पंचायतीचा दर्जा देण्याबाबत घोषणा होऊनही माहे जानेवारी २०१५ अखेरही सदरील नगरपंचायती अस्तीत्वात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नगरपालिका आस्तित्वात आणुन त्यांच्या सुनियोजित विकासासाठी रूग्णालये, शाळा, पाणी पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन व इतर सोयी सुविधा करण्याबाबतचे पुर्व नियोजन शासन स्तरावरून करण्यात आले आहे काय,

(५) असल्यास, किती मुदतीत सदरील नगर पंचायती अस्तित्वात येणार आहेत,

(६) तसेच शासनस्तरावरून याबाबत कोणत्या उपाय योजना सुरू केल्या आहेत वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या व भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या (सुधारित ६० गांवे) प्रारुप विकास योजनेस शासनाने मंजूरी दिली असुन, याबाबतच्या अधिससुचना व सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील उपरोक्त २७ गांवे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावे व भिवंडी तालुक्यातील ५१ गांवे (सुधारित ६० गांवे) या गावांच्या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे विशेष नियोजन प्राधिकरण असून, या क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामांबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमांतर्गत प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येते.

(३), (४), (५) व (६) राज्यात १३८ ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याचे प्रस्तावित नसुन, फक्त तालुका मुख्यालयाच्या ठिकाणच्या १३३ ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १/३/२०१४ रोजी प्राथमिक उद्घोषणा प्रसिध्द करण्यात आली आहे सदर उद्घोषणेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन काही नगरपंचायतींच्या स्थापनेबाबत कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. इतर नगरपंचायतींबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सदर नगरपंचायतींची स्थापना झाल्यानंतर त्यानुषंगाने शाळा, रुग्णालये याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

अमरावती तपोवन येथील बाल वस्तीगृहातील मुलींचे होत असलेले लैंगिक शोषण

(३१) * २९६१ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तपोवन (जि.अमरावती) येथील बाल वसतीगृहात ३२ मुलींचे लैंगिक शोषण होत असल्याची तक्रार राज्य महिला आयोगाला प्राप्त झाल्याने सदर महिला आयोगाच्या चौकशीत विनयभंग व बलात्कार झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) तपोवन (जि.अमरावती) येथील बाल वस्तीगृहात लैगिंक शोषण होत असल्याबाबत आयोगाने केलेल्या चौकशीत ३२ मुलींच्या चिठ्ठया तक्रारपेटीमध्ये आढळून आल्या. सदर ३२ चिठ्ठयांपैकी ज्या प्रकरणी मुलींनी तक्रारी दिलेल्या आहेत त्या प्रकरणी योग्य ते गुन्हे दाखल करुन आरोपींवर कार्यवाही करण्यात आली आहे. काही चिठ्ठया निनावी असून याबाबत कोणत्याही मुलीने तक्रार दिलेली नाही. काही चिठ्ठयांमध्ये वस्तीगृहातील सोयीसुविधांची कमतरता असल्याच्या तक्रारी असल्यामुळे सदर तक्रारी महिला व बालविकास अधिकारी, अमरावती यांना योग्य त्या कार्यवाहीकरीता देण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

(१) दिनांक २६/१२/२०१४ रोजी गु.र.नं.५६९/२०१४ भा.दं.वि. कलम ३५४ (ड), ५०६ (ब) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ च्या कलम १२ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात तीन आरोपी निष्पन्न झाले आहेत. त्यापैकी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून एक आरोपी फरार आहे. सदर प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

(२) दिनांक ०२/०१/२०१५ रोजी.गु.र.क्र.३००३/२०१५ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ च्या कलम २३ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीने अटकपूर्व जामिनाकरीता अर्ज केलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

तसेच या व्यतिरिक्त माहे डिसेंबर मध्ये पुढीलप्रमाणे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(१) दिनांक ११/१२/२०१४ रोजी गु.र.नं.५३७/२०१४ भा.दं.वि.कलम ३७६ (२) (डी) (आय), ३५४ तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ च्या कलम ४, ६, ८, १०, १२, २१(२) आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा ३(१) (१२), ३ (२) (५) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

(२) दिनांक २०/१२/२०१४ रोजी गु.र.नं.५६०/२०१४ भा.दं.वि.कलम ३७६ (२) डी.(आय), ३५४ तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ च्या कलम ४, ६, ८, १०, १२ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथे असलेल्या गुंफेवर राहणाऱ्या रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत

(३२) * ३११४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व) येथे असलेल्या गुंफेवर राहणाऱ्या तेथील रहिवाशांना त्यांची घरे रिकामी करण्याची नोटीस एमएमआरडीने दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील आजूबाजूच्या परिसराचा विकास पण करू नये अशी देखील नोटीस पाठविण्यात आलेली आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, सदर रहिवाशांचे पुनर्वसन नियमाप्रमाणे जवळच असलेल्या ठिकाणी करण्याबाबत तसेच तेथे जवळच असलेल्या भागाचा विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) तालुक्यातील विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याला सागरी सुरक्षा नसल्याबाबत

(३३) * ४१०६ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात असणाऱ्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्यालगत सुरक्षा रक्षक, लाईफ गार्ड, टेहळणी पोलीस नसल्यामुळे सागरी सुरक्षा धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सागरी सुरक्षतेत वाढ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) व (३) वसई तालुक्यातील सागरी किना-यावर व खाडी किनारी विशेष पोलीस नियुक्त करण्यात आले असून, पोलीस अधिकारी/कर्मचारी सागरी किनारी सतर्कतेने गस्त घालत आहेत. शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या ४ स्पीडबोटी यांचे माध्यमातून नियमितपणे सशस्त्र पेट्रोलिंग करण्यात येते. सागरी किनारी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याकरीता पोलीस बंदोबस्त नेमून सागरी सुरक्षा अधिक दक्षपणे पार पाडली जाते. सागर किनारी असलेले चेकपोस्ट, लँडींग पॉईंट, जेट्टी, खाडी किनारा येथे येणारे वाहन, बोटी, व्यक्ती यांची कसून तपासणी केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरातील परळ येथील पशुवैद्यकीय रुग्णालयातील १५० कर्मचाऱ्यांच्या पगारवाढ व इतर मागण्याबाबत

(३४) * ३०६५ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील परळ येथील पशुवैद्यकिय रुग्णालयातील सुमारे १५० कर्मचाऱ्यांनी पगारवाढीसह इतर मागण्यांसाठी सार्वजनिक सुट्टी घेत दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास तीव्र आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांच्या कोणकोणत्या मागण्या आहेत व सदर मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) या संदर्भात शासनाने अद्यापही कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) किमान वेतनापूक्षा कमी वेतनावरील कर्मचा-यांना किमान वेतन देणे. अतिरिक्त सेवा वेतनवाढ, निश्चित महागाई भता, धुलाई भत्ता , रजा विषयक वैद्यकीय लाभ ,घरभाडे भत्ता व इतर अशा एकूण २२ मागण्या संस्थेच्या कर्मचा-यांनी मुंबई लेबर युनियन मार्फत दिनांक ३० जानेवारी, २०१३ च्या पत्रान्वये संस्थेचे सचिव यांना सादर केल्या आहेत .

सदर संस्थेचा शासनाशी थेट संबंध येत नसल्याने शासनाचा हस्तक्षेप असत नाही. याबाबतचा निर्णय हा संस्थेच्या पातळीवर होणे अपेक्षित आहे.

(३) सदर मागण्यांबाबत विश्वस्त मंडळाची बैठक घेऊन लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल असे संस्थेच्या सचिवांना कळविले आहे.

राज्यातील भटक्या विमुक्त जाती जमातीच्या लोकांवर पोलीसांकडून होणा-या अन्यायाबाबत

(३५) * ३३२२ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुन्हेगारी जमाती कायदा १९७१ हा कायदा मोडीत काढत महाराष्ट्र सरकारने मुंबई सराईत गुन्हेगारी कायदा, १९५९ हा अंमलात आणला परंतू या कायद्याचा पोलीसांनी दुरुपयोग केल्याच्या बऱ्याच घटना घडत आहेत तसेच भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांना या कायद्याद्वारे लहान लहान गुन्ह्यासाठी बंदिस्त करणे, मारहाण करणे, खोट्या खटल्यांमध्ये अडकविणे इत्यादी प्रकार राज्यातील विविध जिल्ह्यात घडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भटक्या विमुक्तांवर असे खटले दाखल करणाऱ्या पोलीसांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, काहीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही, अशा प्रकारच्या कोणत्याही घटनेबाबत महाराष्ट्र राज्यात गुन्हा नोंद नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील पालीच्या खंडोबाच्या जत्रेत झालेली दुर्घटना

(३६) * ३३४८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील पालीच्या खंडोबाच्या जत्रेत बिथरलेल्या हत्तीमुळे चेंगराचेंगरीत झालेल्या दुर्घटनेमध्ये एक महिला व ७ जण जखमी झाल्याची घटना दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी यात्रेत सन २००५ मध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत २९३ भाविक मरण पावले या घटनेची चौकशी आणि भविष्यात पुन्हा असे काही होऊ नये म्हणून न्यायमूर्ती राजन कोचर यांची नियुक्ती केली या आयोगाने शासनाकडे अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आयोगाने सादर केलेल्या अहवालात यात्रा-जत्रांतील दुर्घटना टाळाव्यात म्हणून दिलेल्या उपाययोजनांचा अहवाल दहा वर्षे झाली तरी शासनाने त्याची अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग-१ मधील घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आयोगाने सादर केलेल्या अहवालात यात्रा-जत्रांतील दुर्घटना टाळाव्यात म्हणून दिलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) प्रश्नात नमूद प्रकरणी मिरवणूकी दरम्यान कोणीतरी भाविकाने नवसाची मेंढीची लोकर हत्तीच्या अंगावर टाकली असता ती त्याच्या सोंडेत गेली, सोंडेतील लोकर काढण्यासाठी हत्ती चित्करला व त्याने मार्ग बदलला. त्यामध्ये हत्तीच्या पायाचा धक्का लागून घडलेल्या अपघातात एक महिला ठार झाली असून एक महिला जखमी झाली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

कोचर आयोगाच्या शिफराशी नुसार यात्रेचे आयोजक व देवस्थान विश्वस्त यांचेसोबत बैठका घेऊन वेगवेगळ्या धोक्याविषयी सूचना दिल्या जातात. दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी झाली किंवा नाही हे पाहिले जाते.

(४) व (५) होय.

प्रकरणी मिरवणूकी दरम्यान कोणीतरी भाविकाने नवसाची मेंढीची लोकर हत्तीच्या अंगावर टाकल्याने ती त्याच्या सोंडेत गेली, सोंडेतील लोकर काढण्यासाठी हत्ती चित्करला व त्याने मार्ग बदलला. त्यामध्ये हत्तीच्या पायाच्या धक्का लागून घडलेल्या अपघातात एक महिला ठार झाली असून एक महिला जखमी झाली आहे.

सदर प्रकरणी उंब्रज पोलीस ठाणे येथे मयत ०१/०१५ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे अकस्मात मयत दाखल करण्यात आली असून चौकशी सुरू आहे.

कोचर आयोगाच्या शिफारशी नुसार यात्रेचे आयोजक व देवस्थान विश्वस्त यांचेसोबत बैठका घेऊन वेगवेगळ्या धोक्याविषयी सूचना दिल्या जातात. दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी झाली किंवा नाही हे पाहिले जाते.

यात्रा कालावधीत वाहतूक मार्गात जरुरी प्रमाणे बदल करण्यात येतात मंदीर परिसरात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बॅरीकेटींग करण्यात येते. दर्शनासाठी जाणारे भाविक व दर्शन घेवुन बाहेर पडणारे भाविक यांचेसाठी वेगवेगळे मार्ग करण्यात येतात. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी वेगवेगळ्या रांगा तयार करण्यात येतात. आवश्यक तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो. गर्दीच्या वेळी कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडू नये याकरिता आवश्यकतेप्रमाणे ध्वनिक्षेपकावरुन भाविकांना विनंती करण्यात येत असते. तसेच इतर सुविधा पुरविण्यासाठी संबंधित विभागांना पत्रव्यवहार करण्यात येत असतो.

श्री.यमाई देवस्थान ट्रस्ट औंध ता.खटाव यांना दिनांक ०५/०१/२०१५ च्या पत्रान्वये यात्रा मिरणूकीकरीता हत्तीचा वापर करु नये याबाबत लेखी समज देण्यात आली आहे.

(६) विलंब झालेला नाही.

मुंबईतील दिनांक २९ सप्टेंबर, २००९ नंतर उभारण्यात आलेल्या धार्मिक स्थळावर कारवाई करण्याबाबत

(३७) * ३६३५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक २९ सप्टेंबर, २००९ नंतर उभारण्यात आलेल्या धार्मिक स्थळांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते परंतु या निर्णयाची अंमलबजावणी शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून झाली नसल्याने मुंबईतील एकूण ७४२ धार्मिक स्थळांवर कारवाई करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार किती धार्मिक स्थळावर कारवाई करण्यात आली आहे,

(३) उर्वरित धार्मिक स्थळावर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत व त्या धार्मिक स्थळावर केव्हा कारवाई करण्यात येईल ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सिंहगड रस्त्यावर वारंवार होणाऱ्या लुटमारीच्या घटना रोखण्याबाबत

(३८) * ३१६७ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंहगड (जि.पुणे) रस्त्यावरुन जाणाऱ्या तीन व्यक्तींकडील सोन्याचे दागिने, किंमती वस्तू व पैसे पळविण्याच्या वेगवेगळया घटना दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सिंहगड रस्त्यावर वारंवार होणाऱ्या लुटमारीच्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, सदर घटनासंदर्भात दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे गुरक्र. १२/१५ भादंवि कलम ३९२ प्रमाणे दिनांक १८.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(३) अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून सिंहगड रोडवर नाकाबंदी, पेट्रोलिंग करण्यात येत आहे. तसेच गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याकरीता स्वतंत्र सिंहगड पोलीस ठाणेची निर्मिती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईत वाहनतळ उभारण्याबाबत

(३९) * ३१४३ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जर्नादन चांदूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे सन १९९१ मध्ये वाहनांची संख्या ६ लाख २८ हजार होती. सन २०१४ अखेर ही संख्या २४ लाख ७५ हजारावर गेली आहे. त्यामुळे मुंबई मध्ये पार्कींग सुधारणेवर ताण आला असून अजून किमान ५० हजार वाहनतळ निर्माण करण्याची गरज असल्याची जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरविले आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबई पोलीसांच्या वाहतुक शाखेने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ५/११/२०१४ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये ५०,००० वाहनतळाचे

आवश्यकतेबाबत उल्लेख आहे. सदर संख्या कोणत्या आधारावर निश्चित केली याचा सदर पत्रामध्ये उल्लेख नाही. वाहनतळाच्या निश्चित आवश्यक संख्येबाबत पडताळणी झालेली नाही. (२), (३) व (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये सार्वजनिक वाहतनळाबाबत विनियम ३३ (२४) ची तरतूद दिनांक २०/१०/२००८ च्या अधिसूचनेन्वये अंतर्भूत झालेली आहे. त्यानुसार खाजगी जागेवर जमीन मालकांने सार्वजनिक वाहनतळ बांधून महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेस जमीन मालकांना प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देणेची तरतूद केलेली आहे. सदर विनियमामध्ये शासनाकडील दिनांक ६/८/२०१४ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा केलेल्या आहेत.

वरील तरतुदींनुसार आजपर्यंत ५९ ठिकाणी सुमारे ४२६६४ वाहनांसाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी अपोलो मिल, ना.म.जोशी मार्ग व कांजूर मार्ग या दोन ठिकाणी सार्वजनिक वाहनतळ कार्यान्वित झालेले असून त्यांची क्षमता अंदाजे अनुक्रमे ८४७ व ४०२ वाहनांची आहे.

मुंबईतील वाहतुकीच्या प्रश्नांसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ६२/२०१४ मध्ये मुख्य सचिव यांना प्रधान सचिव, नगर विकास विभाग; आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका; प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महानगर आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण; पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व इतर संबंधित अधिकारी यांची एकत्रित बैठक घेण्याचे आदेश दिनांक ११/२/२०१५ रोजी दिलेले होते.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार १) बहुमजली पार्किंग करता येईल किंवा कसे, २) अंडर ग्राऊंड पार्किंग अनुज्ञेय करता येईल किंवा कसे, ३) पार्किंगसाठी जागा असलेशिवाय वाहने खरेदी/नोंदणी करणेस बंधन घालणे, ४) सार्वजनिक महत्वाच्या ठिकाणी चुकीचे पार्किंग केल्याबद्दल भरीव स्वरुपाची शास्ती लावणे, त्याकरीता गस्त घालणाऱ्या वाहनांची तरतूद करणे या पर्यायाबाबत विचार करणेबाबत आदेशित केले आहे.

मुख्य सचिव यांनी दिनांक ०४/०३/२०१५ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेतलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने सुचविलेले पर्याय व इतर पर्याय विचारात घेवून याबाबत ठोस स्वरुपाची उपाययोजना करणेचे संकल्पित आहे.

जाधववाडीतील सिध्देश्वर येथील (जि.औरंगाबाद) कुटूंबाला
जात पंचायतीने वाळीत टाकल्याबाबत

(४०) * ३२४० श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रायगड जिल्ह्यापाठोपाठ आता औरंगाबाद जिल्हा येथेही जाधववाडीतील सिध्देश्वर येथील रंजना सचिन पांडे यांच्या कुटूंबाला प्रेम विवाह केला म्हणून जात पंचायतीने पांडे कुटूंबियाना वाळीत टाकल्याची घटना माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पुण्यातील पिंपरी-चिंचवड, आंळदी, इचलकरंजी, संमनेर व औरंगाबाद याठिकाणी भरविण्यात आलेल्या वेगवेगळया जातपंचायतींमध्ये दंडापोटी दोघांकडून

१ लाख ७० हजार रूपये वसूल करूनही जात पंचायतीने बहिष्कार मागे घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळून येणाऱ्या जातपंचायतीवर असलेल्या सदस्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच अशाप्रकारच्या वारंवार घडत असलेल्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्यांची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन पो.स्टे. एम.आय.डी.सी. सिडको नारेगाव, जि.औरंगाबाद गु.र.क्र.९/२०१५ कलम १५३ (अ), ३८४, ३८७, १२० (अ), ५०३, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एकूण ११ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. आरोपी सध्या जामीनावर मुक्त असून पुढील तपास सुरु आहे.

(५) सामाजिक बहिष्कारासंदर्भात प्राप्त तक्रारीबाबत योग्य ती कारवाई करण्याबाबत दिनांक ३०.०९.२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य मानवी हक्क आयोगाकडे सध्या १४ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(४१) * ४४८७ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मानवी हक्क आयोगाकडे सध्या १४ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक ८ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी शासनाने आयोगाला काय मदत केली वा करण्यात येत आहे

(३) अद्याप, कोणतीही मदत केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी एकूण १७४८९ प्रकरणे प्रलंबित होती.

(२), व (३), माहे सप्टेंबर, २०१३ पासून आयोगावर अध्यक्ष व एक सदस्य याची नियुक्ती केलेली आहे. तसेच दुस-या सदस्याची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

पुणे येरवडा यथील खुल्या कारागृहामध्ये शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना बेदम मारहाण केल्याबाबत

(४२) * ४६५६ श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येरवडा येथील खुल्या कारागृहामध्ये शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना किरकोळ कारणावरून दिनांक १६ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास बेदम मारहाण करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मारहाणीच्या निषेधार्थ कैद्यांनी उपोषण, आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

दिनांक १६ जानेवारी, २०१४ रोजी सकाळी ८.४० वाजताचे दरम्यान कारागृहातील दोन बंद्यांची आपसी किरकोळ बाचाबाची झाली वेळीच कारागृह सुरक्षा रक्षकांनी हस्तक्षेप करुन दोन्ही बंद्यांची शाब्दीक बाचाबाची सोडवली. सदर घटनेत कोणत्याही बंद्यास मारहाण करण्यात आलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शौर्यपदक प्राप्त शहीद जवानांच्या कुटुंबियांना विशेष सवलती देण्याचे शासनाचे धोरण

(४३) * ४९१६ श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शौर्यपदक प्राप्त शहीद जवानांच्या कुटुंबियांना विशेष सवलती देण्यासाठी राज्य शासनाने धोरण तयार केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणामध्ये कोणकोणत्या सवलती देण्याचे नमूद केले आहे,

(३) तसेच उक्त धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) अ) राज्यातील शौर्यपदक प्राप्त शहीद जवानांच्या कुटूंबियांना विशेष सवलती देण्याचे धोरण प्रथमत: दिनांक १७/८/१९८३ च्या शासन निर्णयान्वये आखण्यात आलेले असून तेव्हापासून याबाबत अंमजबजावणी करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयामध्ये वेळोवेळी

सुधारणा करण्यात आलेल्या असून शौर्यपदक प्राप्त शहीद जवानांच्या विधवांना / अवलंबितांना, दिनांक ०१/०५/२०११ पासून खालीलप्रमाणे दरमहा अनुदान देण्यात येत आहे.

अ.क्र.	**शौर्य पदकाचे नांव**	**दिनांक ०७/०५/२०११ च्या शासन निर्णयानुसार, दिनांक ०१/०५/२०११ पासून देयअनुदान**
१	परमवीर चक्र	१२,५००/-
२	अशोक चक्र	१०,०००/-
३	सर्वोत्तम युध्द सेवा पदक	९,५००/-
४	महावीर चक्र	९,५००/-
५	किर्ती चक्र	७,५००/-
६	उत्तमयुध्द सेवा पदक	६,५००/-
७	वीर चक्र	५,५००/-
८	शौर्य चक्र	३,५००/-
९	युध्द सेवा पदक	३,०००/-
१०	सेना/नौसेना/वायु सेना पदक	२,०००/-
११	मेन्शन-इन-डिस्पॅच	१,०००/-
१२	व्हिक्टोरिया क्रॉस	१०,५००/-

ब) शौर्यपदक प्राप्त शहीद जवानांच्या कुटूंबियांना खालील सवलती दिल्या जातात :-

(१) शासन निर्णय दिनांक ०२/०९/१९८३ नुसार सैनिकी सेवेत मृत्यू पावलेल्या सैनिकांच्या कुटूंबातील एका व्यक्तिला वर्ग-३ व वर्ग-४ मधील १५% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवरील भरतीकरिता विहित केलेल्या अग्रक्रमानुसार नियुक्ती देण्याची सवलत.

(२) शासन निर्णय दिनांक ७/२/२००० नुसार महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेल्या युध्दविधवांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये दरमहा ३०० कि.मी. किंवा एका वर्षात जास्तीत जास्त २५०० कि.मी. इतक्या सरासरी अंतरापर्यंत १०० टक्के प्रवास खर्चाच्या मर्यादेत विनामूल्य प्रवासाची सवलत.

(३) माजी/दिवंगत सैनिक व त्यांचे अवलंबितांना कल्याणकारी निधीतून चरितार्थासाठी, मुलींच्या लग्नासाठी तसेच वैद्यकीय, पाल्यांचे शिक्षण, स्वयंरोजगार, घरकुल इ. साठी आर्थिक मदत तसेच युध्दात / मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या कुटूंबियांना, सेवारत सैनिक दिवंगत झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना तसेच तद्नुषगिंक अन्य प्रयोजनांसाठी विहित केल्यानुसार इतर अर्थसहाय्याच्या कल्याणकारी योजना, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्या मार्फत राबविल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रामस्तरावर जलद न्याय मिळण्यासाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्राम न्यायालये स्थापन करण्याबाबत

(४४) * ५४७३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यायालयीन व्यवस्थेवरील अतिरिक्त ताण कमी करुन ग्रामस्तरावर जलद न्याय मिळण्यासाठी ग्राम न्यायालय कायदा अस्तित्वात येवूनही राज्यात सुमारे २७८९६ गावांपैकी केवळ ९ ठिकाणी ग्रामन्यायालये अस्तित्वात आल्याबद्दल औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारला यातील विसंगती दूर करण्याबाबतचे आदेश सन २०१४-१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्राम न्यायालये स्थापन करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती कालावधीत संपुर्ण राज्यात ग्राम न्यायालये स्थापन करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

(२) न्यायालये नसतील अशा ग्रामीण क्षेत्राच्या प्रत्येक तालुक्यातील जनतेस न्याय मिळावा हा ग्राम न्यायालय कायदा-२००८ चा मूळ उद्देश आहे.

ग्राम न्यायालयाच्या स्थापनेबाबतीत राज्य शासन व उच्च न्यायालयाने पहिल्या टप्पात ९ ग्राम न्यायालये स्थापन केली आहेत. तर टप्पा २ मध्ये १० ग्राम न्यायालये स्थापन झालेली आहेत. नियोजित उर्वरीत २० ग्राम न्यायालये त्यांचे स्थापने करीतांच्या मुलभूत सोयी सुविधेच्या उपलब्धतेनुसार स्थापन होणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील समांतर भूमिगत गटार योजनेत झालेला गैरव्यवहार

(४५) * ५६३८ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील समांतर भूमिगत गटार योजनेसाठी एचडीपी पाईप वापरण्याबाबत प्रस्ताव मंजूर करण्यात येऊनही एचडीपी पाईप वापरण्याऐवजी डीआय पाईप वापरण्याचा निर्णय घेण्यात येऊन आपल्या मर्जीतील उद्योजकाला काम देण्यात आल्याचे माहे जानेवारी,

२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाच्या चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच मंजूर करण्यात आलेले एचडीपीच पाईप वापरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

औरंगाबाद शहरातील भूमीगत गटार योजनेसाठी एचडीपी पाईप ऐवजी डीआय पाईप वापरण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव माहे जानेवारी, २०१५ अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आलेला नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्रमुख शहरात नऊ आसनी विमानांची शेडयुल्ड सेवा सुरु करण्याचा प्रस्तावाबाबत

(४६) * ५७२४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रमुख शहरे नाशिक, जळगाव, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद येथे नऊ आसनी विमानांची शेडयुल्ड सेवा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विचाराधीन असलेल्या प्रस्तावाच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, अंमलबजावणीचा तपशील काय,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) राज्यातील प्रमुख शहरे हवाई मार्गे जोडण्यासाठी कमी आसन क्षमतेच्या नियमित हवाई सेवा सुरु करण्याचा राज्य शासनाचा मानस असुन त्या अनुषंगाने विविध विमान कंपन्या तसेच मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लि.सोबत प्राथमिक स्तरावर चर्चा सुरु आहे. तथापि, कंपन्यांनी याप्रकरणी अद्यापपावेतो स्वारस्य दर्शविलेले नाही.

मुंबई महानगरपालिकेने सुरु केलेल्या महत्वाकांक्षी ब्रिमस्टोवॅड प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

(४७) * ५७४५ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीनंतर जलवाहिन्या सुधारण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सुरु केलेल्या महत्वाकांक्षी ब्रिमस्टोवॅड प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असतानाच या प्रकल्पात अनियमीतता असल्याचे

भारताचे महालेखापरिक्षक (कॅग) यांनीही अधोरेखित केले असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील कंत्राटदारांना पालिकेने नियमबाहय पध्दतीने देयके अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील अनियमिततेवर कॅगने ताशेरे ओढल्याबाबत अहवाल प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे साळवाडी (ता.भोकर, जि.नांदेड) येथील संस्था चालकांवर झालेला हल्ला

(४८) * ५८६१ श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साळवाडी (ता.भोकर, जि.नांदेड) येथील संस्था चालक श्री.बालाजी शिंदे यांना जिवंत मारण्याच्या उद्देशाने दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अज्ञातांनी हल्ला केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील संस्थाचालक पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यास गेला असता त्यांची फिर्याद नोंदवून घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार हल्ला करणा-या आरोपींचा शोध घेऊन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच संस्थाचालकाची फिर्याद नोंदवून न घेणा-या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

अशा प्रकारची घटना घडल्याची कोणत्याही प्रकारची तक्रार भोकर पोलीस स्टेशन मध्ये प्राप्त नाही.

(२) नाही.

प्रश्नात नमूद संस्थाचालक पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविण्यासाठी आले नाहीत.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात पुरेसा प्रकाश व वीजबचत होण्याच्या दृष्टीने रस्त्यावर एलईडी दिवे लावण्याबाबत

(४९) * ३८०८ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात पुरेसा प्रकाश व वीज बचत होण्याच्या दृष्टीने मुंबईच्या रस्त्यावरही एलईडी दिवे लावण्याची योजना मुंबई महानगरपालिका व शासनातर्फे राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलईडी दिव्यासाठी खर्च किती येणार आहे त्यापैकी शासन व मुंबई महानगरपालिका किती खर्च करणार आहे,

(३) तसेच सदर योजना केव्हापासून कार्यान्वित करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या विद्युत उर्जा बचतीसाठीच्या केंद्रीय धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने राबविण्याचे प्रस्ताविले आहे.

(२) केंद्र शासनाच्या धोरणानुसार नियुक्त केलेल्या मे. एनर्जी इफिशियन्सी सर्विस लि. यांनी बृहन्मुंबई शहर, पश्चिम व पूर्व उपनगरातील दिव्यांसाठी दिलेल्या प्रस्तावामध्ये अंदाजे रु १३९.५० कोटी खर्च अपेक्षित आहे. सुरवातीस एलईडी दिवे लावण्यासाठी भांडवली कामाचा खर्च मे. एनर्जी इफिशियन्सी सर्विस लि. या कंपनीमार्फत करण्याचे प्रायोजिले आहे. त्यानंतर रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वार्षिक वीज बचतीमुळे प्राप्त होणा-या रकमेतून सदर कंपनीस त्यांनी सुरुवातीस केलेल्या भांडवली खर्चाचा परतावा, एलईडी दिवे बसविण्याचे काम कार्यान्वित केल्यानंतर पुढील सात वर्षात टप्याटप्याने करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) सध्या प्रायोगिक तत्वावर मरिन ड्राईव्ह येथे एलईडी बसविण्याचे काम कार्यान्वित झाले आहे व त्यासाठी बृहनमुंबई महानगरपालिकेने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, सदर कंपनीतर्फे योग्य तो प्रस्ताव सादर झाल्यानंतर आवश्यक त्या प्रशासकीय कार्यवाहीनुसार बृहन्मुंबईतील शहर, पश्चिम व पूर्व उपनगरांमध्ये एलईडी दिवे बसविण्याची योजना राबविणे प्रस्तावित आहे.

राज्यातील शहरी भागातील एसआरएच्या जमिनीसाठी विकासकाने रेडीरेकरनच्या आकारणीबाबत

(५०) * ३७९५ श्री.विजय गिरकर, श्री.राजेंद्र मुळक : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागातील एसआरएच्या जमिनीसाठी विकासकाने रेडीरेकनरच्या आकारणीप्रमाणे २५ टक्के शुल्क देणे आवश्यक असल्याच्या सरकारी आदेशाचा चुकीचा अर्थ

लावल्याने एसआरए प्राधिकरणाला कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील जोगेश्वरी विभागातील शिवदर्शन आणि जीवनज्योती या दोन सोसायटयांच्या रेडीरेकनर दर आकारणीत एसआरएला ९ कोटी रुपयांचा तोटा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१), (२) व (३) निवासी लेखा परिक्षा अधिका-यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ मध्ये केलेल्या निरीक्षणात शिवदर्शन एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था व जीवनज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था या दोन संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजने संदर्भात शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक २६.५.२००९ च्या तरतूदीनुसार विकासकाकडून वसूल करण्यात येणा-या अधिमूल्याच्या रकमेची चुकीच्या पध्दतीने गणना केल्यामुळे पहिल्या टप्प्यातील अधिमूल्य वसूलीमध्ये रुपये ८.६० कोटीचा तोटा झाल्याचा आक्षेप नोंदविला होता. सदर आक्षेपास अनुसरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ७.२.२०१४, दिनांक ११.२.२०१४ व दिनांक २३.२.२०१५ अन्वये विकासकाकडून वसूल करण्यात येणारी अधिमूल्याची रक्कम शासन अधिसूचना, नगर विकास विभाग दिनांक १६.४.२००८ व दिनांक २८.६.२०१२, तसेच शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक २.७.२०१० अन्वये करण्यात आलेली असून ती योग्य आहे अशा आशयाचा पूर्तता अहवाल लेखा अधिका-यांना पाठवून तो अापेक्ष बंद करण्याबाबत कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव (जि.नाशिक) येथील नवीन बसस्थानक आगारात समाजकंटक घालत असलेल्या उपद्रवास प्रतिबंध करण्याची बाब

(५१) * ५२५७ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील नवीन बस स्थानक आगार प्रशासनाकडून वेळोवेळी पोलिसांकडे तक्रार करुनही त्याची दखल घेण्यात येत नसल्याने बस स्थानक आगारातील संरक्षक भिंतीची समाजकंटकाकडून वारंवार तोडफोड करण्यात येवून आवारातील वस्तुंची चोरी केली जात असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकंटकाकडून आवारात कचरा फेकणे, तुंबलेल्या गटारीचे पाणी सोडणे, सायंकाळ नंतर जुगारी व दारुडयांचा अड्डा जमणे, रात्री-अपरात्री दगडफेक केली जाणे, पथदिप फोडणे इत्यादी प्रकार केले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालेगांव बसआगार व वर्कशॉपची व्याप्ती, मोठया प्रमाणात रात्रंदिवस सुरु असलेल्या बस फेऱ्या, शहराची संवेदनशिलता आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गांभिर्याने विचार करुन समाजकंटकाचा उपद्रव रोखण्यासाठी शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे दै.लोकमत वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. तथापि याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आलेली नाही.

(२) दिनांक १९/०१/१५ रोजी मालेगांव नियंत्रण कक्ष येथून आयेशा नगर पोलीस ठाण्यात दुरध्वनीद्वारे माहिती मिळाली की बसस्थानक पाण्याच्या टाकीजवळ काही दारुडे लोक बसलेले आहेत. याबाबतची खात्री व कार्यवाही करण्यासाठी पोलीस कर्मचारी पाठविले असता सदर ठिकाणी कोणीही दारुडे इसम आढळून आलेले नव्हते.

(३) समाजकंटकाचा उपद्रव होऊ नये व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बसस्थानक परिसरात दिवस-रात्र २ पोलीस कर्मचारी यांची नेमणूक केलेली आहे. या परिसरात मोबाईल पेट्रोलिंग, बिट मार्शल पेट्रोलिंग करण्यात येते. तद्वतच वरिष्ठ/दुय्यम पोलीस अधिकारी सदर परिसरात भेटी देत असतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयातील एका डॉक्टरला डेंग्यू रोगाचा झालेला प्रादुर्भाव

(५२) * ३९९८ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयातील एका डॉक्टरला डेंग्यू रोगाचा प्रादुर्भाव झाला असून यापूर्वी आठ डॉक्टरांना डेंग्यु रोगाची लागण होऊन त्यात एका डॉक्टराचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार डेंग्यूचा प्रादुर्भाव झालेल्या डॉक्टरांना औषधोपचार करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच डेंग्यूच्या साथीला प्रतिबंध करणेबाबत कोणती उपाययोजना केली आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) उक्त प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयाच्या संबंधित औषधवैद्यक शास्त्र विभागाप्रमुखांमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आठही डॉक्टरांना डेंग्यूचे व्यवस्थित व उपयुक्त उपचार करण्यात आले होते. पण एका डॉक्टरांच्या बाबतीत डेंग्यू आजाराचे दुष्परिणाम झाल्याने

फुप्फुसांवर सूज आली. सदर आजारावर सर्व उपचार करण्यात आले होते. परंतु त्यांचे नातेवाईक त्यांना घेऊन हिंदूजा हॉस्पिटलमध्ये गेले तेथे त्यांचा मृत्यू झाला.

(४) डेंग्यूच्या साथीला प्रतिबंध करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

(१) के.ई.एम. रुग्णालय परिसरातील सर्व इमारतींवर असलेल्या पाण्याच्या टाकींचे सर्वेक्षण करुन त्या मॉस्क्यूटो प्रूफ करण्यात आल्या आहेत.

(२) डेंग्यूंच्या अळी असलेल्या पाण्याचा साठयाचा शोध घेऊन तो नष्ट करण्यात आला.

(३) रुग्णालय परिसरातील टाकऊ वस्तु परिसराबाहेर पाठवून त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली.

(४) सर्व विद्यार्थी वसतिगृहात डेंग्यूच्या अळी असलेल्या पाण्याच्या साठयाचा शोध घेऊन त्या नष्ट करण्यात आल्या.

(५) डेंग्यू रुग्णांच्या उपचाराकरिता काही रुग्णशय्यांसह एक कक्ष राखीव ठेवण्यात आला.

(६) सर्व डॉक्टरांसाठी डेंग्यू निदान, उपचार आणि प्रतिबंध याबाबत प्रशिक्षण घेण्यात आले.

(७) महापालिकेच्या किटकनाशक विभागाच्या सहकार्याने के.ई.एम. रुग्णालय परिसरात वेळोवेळी किटकनाशक फवारा मारण्यात आला.

(८) डेंग्यू रुग्णांची नोंद आणि अहवाल दैनंदिन पातळीवर ठेवण्यात येत आहे.

(९) के.ई.एम. रुग्णालयातील रक्तपेढी डेंग्यू उपचाराच्या अनुषंगाने सुसज्ज ठेवण्यात आली आहे.

(१०) डेंग्यू रुग्णांना आवश्यक असलेला औषधोपचार सातत्याने उपलब्ध राहील याची दक्षता घेतली जात आहे.

नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत

(५३) * ४०७७ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) परिसरात लोकसंख्येत ११८ टक्यांनी वाढ झाली असून या परिसरात खून, चोऱ्या, बलात्काराच्या घटना व वाढत्या गुन्हेगारीच्या अनेक प्रकारांमुळे याठिकाणी नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याची मागणी दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर परिसरात नवीन पोलीस ठाणे किती कालावधीत निर्माण करण्यात येणार आहे,

(४) अद्याप, याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक ४/३/२०१४ नुसार नालासोपारा पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन तुळींज पोलीस ठाणे निर्माण करण्यात मान्यता दिली आहे.

विभागाच्या दिनांक ९.२.२०१५ च्या शासन अधिसूचनेनुसार नालासोपारा व तुळींज पोलीस ठाण्यांची हद्दनिश्चिती करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव, खामगांव, नांदुरा, या गावांची हद्दवाढ करण्याबाबत

(५४) * २९१० श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक २९१० ला दिनांक ४ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव, खामगांव, नांदुरा, या गावांची हद्दवाढ करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेगांव, खामगांव, नांदुरा या गावाची हद्दवाढ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावांची हद्दवाढ होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने विधानपरिषदेत विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही अदयापी ठोस कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर हद्दवाढ करण्यास विलंब होत असल्यामुळे शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान होत आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त गावांची हद्दवाढ केव्हापर्यंत होण्याचे अपेक्षित आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) नगर परिषद शेगांव व खामगावच्या हद्दवाढीबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. नांदूरा नगर परिषदेच्या हद्दवाढीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३), (४), (५) व (६) शेगांव व खामगाव नगर परिषदेच्या हद्दवाढीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. जिल्हाधिकारी यांच्याकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उक्त गावांच्या हद्दवाढीबाबत शासन स्तरावरुन यथाशिघ्र कार्यवाही करण्यात येते.

राज्यात स्थानिक संस्था कर रद्द करण्याबाबत

(५५) * ३३९६ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-

पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र मुळक, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १५५ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थानिक संस्था कर रद्द करण्याची घोषणा महाराष्ट्र शासनाने करुनही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक संस्था कर रद्द करुन वॅट आणि मुद्रांक शुल्कात वाढ असे दोन पर्याय सूचविले असल्याने हा बोजा सर्वसामान्य नागरिकांवर पडणार आहे तसेच छोटा किराणा व्यापारी हा घाऊक व्यापा-याकडून माल खरेदी करतो परंतू या छोट्या व्यापा-याचे नाव व्हॅटमध्ये असल्याने त्यांनाही स्थानिक संस्था कर भरण्याच्या नोटीसा आल्या आहेत हे पाहता स्थानिक संस्था करामुळे शासन तसेच सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाल्यामुळे स्थानिक संस्था कर रद्द करण्याबाबत शासनाची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच एलबीटी कधीपर्यंत रद्द करण्यात येईल,

(४) अद्याप एलबीटी रद्द करण्याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेला स्थानिक संस्था कर रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

मुंबईला पाणी पुरवठा करणा-या मोडक सागर तलावातील गाळ काढण्याबाबत

(५६) * ४१४९ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने मोडक सागर तलावातील गाळ वेळीच साफ न केल्यामुळे नऊ दिवसांचा अतिरिक्त पाणीसाठा गाळामुळे वापरात घेणे शक्य नसुन जर वेळीच गाळ साफ न केल्यास हा अतिरिक्त पाणी साठा वापरणे अयोग्य होईल परिणामी मुंबईला पाणीटंचाई सोसावी लागण्याची शक्यता असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये उक्त तलावात लेक टॅपिंगचा प्रयोग केला परंतू गाळ साफ न केल्याने सुमारे ३० हजार दशलक्ष लिटर पाण्याचा जादा पाणी पुरवठा पूर्ण क्षमतेने उपसा करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तलावातील गाळ त्वरीत काढण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मोडकसागर तलावातील गाळ काढण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. परंतु, आगाम बोगद्याच्या मुखाशी असलेल्या व त्याच्या आजूबाजूला साचलेले दगडाचे तुकडे व तळाकडील माती काढण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील पोलीस, सरकारी निमसरकारी कर्मचारी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या घरांबाबत

(५७) * ३३९१ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पोलीस, सरकारी, निमसरकारी कर्मचारी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी म्हाडा मार्फत स्वस्त घरांच्या योजना राबवण्याची मागणी वेळोवेळी होऊनही शासनाने त्याबाबत निर्णय घेतलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती काय आहे,
(३) असल्यास, याबाबतीत शासनाची योजना काय आहे ?

श्री. प्रकाश मेहता : (१), (२) व (३) हे खरे नाही.

वस्तुतः म्हाडाच्या सदनिका आर्थिकदृष्टया दुर्बल गट, अल्प उत्पन्न गट मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट अशी विभागणी करुन सोडत पध्दतीने विक्री करण्यात येतात.

यापूर्वी मुंबईतील पालिसांकरीता म्हाडामार्फत घरांची योजना राबविण्यात आली आहे.

पुणे शहरातील अपघात टाळण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाकडे होर्डींग पॉलीसचा प्रस्ताव पाठविण्याबाबत

(५८) * ३१९१ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील अपघात टाळण्यासाठी पुणे महानगरपालिकेने राज्य शासनाकडे होर्डींग पॉलीसी मंजूरीसाठी पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होर्डींग पॉलीसीला मान्यता देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, तसेच किती कालावधीत होर्डींग पॉलीसी लागू करण्यात येणार आहे,
(३) अद्याप, या प्रस्तावास मान्यता देण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय हे खरे आहे.
(२) महानगरपालिका क्षेत्रातील आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याची नियमन व नियंत्रण करण्याच्या हेतूने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २१/६/२०१४ अन्वये प्रारुप अधिसूचना प्रसिध्द केली. त्यानुसार सर्व संबंधितांना दिनांक ३/१२/२०१४ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही

सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने सर्वच शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(५९) * ३०३४ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विजय गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई,पुणे,ठाणे,नाशिक,नागपूर यासारख्या प्रमुख शहरांमध्ये वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने वाहनचालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होवून रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढले असून, पादचाऱ्यांच्या सुरक्षेची गंभीर समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता वाहतुकीची जबाबदारी असणाऱ्या रस्ता सुरक्षा पोलिसांकडे २२०० ऐवजी फक्त १००० कर्मचारीच असून, भरधाव वाहनांना रोखण्यासाठी वेगवान वाहनेही उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,राज्यात सुरक्षेच्या दृष्टीने घातपात व गैरकृत्याला प्रतिबंध करण्यासाठी आणि वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वच शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विविध महत्वाच्या ठिकाणी असणा-या शासकीय कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेरे मोठ्या प्रमाणात दुरुस्ती अभावी बंद असल्याचे गृह विभागाच्या माहे जानेवारी २०१५ च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्यातील वाहतूक व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांची संख्या वाढवण्याबाबत व सर्वच शहरात प्रत्येक सिग्नलवर आणि महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत व बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) राज्यातील प्रमुख शहरांमध्ये वाहनांची संख्या वाढत असल्याचे आणि रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) राज्यातील महामार्ग पोलीस विभागाकरीता पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची २,३४८ पदे मंजूर

असून १,२२० पदे कार्यरत आहेत.

(३) मुंबई शहरातील सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीने दिनांक ५.१.२०१५ च्या बैठकीमध्ये करार करण्यास मान्यता दिली आहे.

(४) अशा आशयाचा कोणताही उल्लेख गृह विभागाच्या अहवालामध्ये नमुद केलेला नाही.

(५) दिनांक ४/३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र यांच्या अधिनस्त कार्यालयाकरीता अनुक्रमे १,५०० आणि १०,४४३ एवढी पदे नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये पोलीस आयुक्तालये व जिल्हा पोलीसांच्या वाहतूक शाखा यांच्याकरीता निर्माण करण्यात आलेल्या पदांचा समावेश आहे.

सध्या केवळ मुंबई व पुणे शहरामध्ये शासनातर्फे सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्याचे प्रस्तावित आहे. राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथे हेरॉईन विकण्यास आलेल्या परप्रांतियांना बंडगार्डन पोलीसांनी अटक करुन लाखो रुपयांचे हेरॉईन जप्त केल्याबाबत

(६०) * ३२८७ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे हेरॉईन विकण्यास आलेल्या परप्रांतियांना बंडगार्डन पोलीसांनी अटक करुन लाखो रुपयांचे हेरॉईन जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे नगरीत तरुण विद्यार्थ्यांना नशेचे व्यसन लावणाऱ्या अशा समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) दिनांक २६.६.२०१४ या जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील एकूण १०८ शाळा, कॉलेजेस व झोपडपट्टया तसेच सोसायट्यांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पथक व व्यसन मुक्ती केंद्र मुक्तांगण, पुणे यांच्या मदतीने पथनाट्य, संबंधीत बाबत व्याख्याने, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून पंधरवडाचे आयोजन करून जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. शहरातील गर्दीचे ठिकाणी बॅनर्स, रिक्षा, पीएमटीच्या १५० बसेसवर स्टीकर्स लाऊन जनजागृती केली जात आहे.

दिनांक १३.११.२०१४ रोजी पुणे शहर पोलीस दलाचे वतीने पोलीस आयुक्त कार्यालय, कॉन्फरन्स हॉल येथे नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, मुंबई यांच्या सहकार्याने पोलीस अधिकाऱ्यांसाठी 'कॅपेसिटी बिल्डींग विथ पोलीस एजन्सीज अगेन्स्ट ड्रग्ज ट्रॅफीकर्स' या विषयावर एकदिवसीय

कार्यशाळेचे आयोजन करुन पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांना कार्यक्रमास बोलविण्यात आले होते. तसेच सदरहू कार्यक्रमात एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ च्या अंतर्गत असलेल्या विविध अंमली पदार्थांची ओळख करून देऊन त्याबाबत माहिती देण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले विद्यापीठातर्फे एनएसएसचे विद्यार्थ्यांचा कॅम्प आयोजित करून सुमारे ३०० ते ४०० विद्यार्थ्यांना अंमली पदार्थाचे प्रकार व त्यांच्या सेवनामुळे होणा-या दुष्परिणामांबाबत माहिती देण्यात आली होती. पुणे पोलीस आयुक्तालयातर्फे आयोजित रेझिंग डे च्या अनुषंगाने बॅनर्स, पोस्टर्स तसेच त्याबाबत स्टॉल लावून जनजागृती करण्यात आली आहे. हुजूरपागा महाविद्यालय पुणे येथे अंमली पदार्थाचे सेवनामुळे होणा-या परिणामाची डॉक्युमेंट्री फिल्म, व्याख्याने, मार्गदर्शन तसेच प्रश्नोत्तराच्या स्वरुपात चर्चा करण्यात आली आहे.

नशेचे व्यसन लावणा-या समाज कंटकांवर कारवाई करण्यासाठी गुन्हे शाखा, पुणे शहर अंतर्गत स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी पथक कार्यरत असून त्यांचे मार्फत गुन्हेगारांविरुद्ध कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे (जि.ठाणे) महानगरपालिका मुख्यालयातील शहरविकास विभागाचा संगणक ताब्यात घेवून त्यातील नोंदीत बांधकाम व्यवसायीकांनी हस्तक्षेप केल्याबाबत

(६१) * २६६१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (जि.ठाणे) महानगरपालिका मुख्यालयातील शहरविकास विभागाचा संगणक ताब्यात घेवून त्यातील नोंदीत हस्तक्षेप करणाऱ्या मोठ्या बांधकाम व्यावसायीकांच्या हस्तकांना काही लोकप्रतिनिधीनी पकडल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहर विकास विभाग व विकासक यांच्यामध्ये संगनमत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहर विकास विभागामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेराद्वारे नियंत्रण ठेवले जात असतानासुध्दा सदर प्रतिनिधी कोणाच्या परवानगीने संगणक हाताळत होते याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) तसेच, कोणकोणत्या बांधकाम व्यावसायिकांच्या हस्तकांना पकडण्यात आले आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन बांधकाम व्यावसायिकांवर व त्यांना मदत करणा-या शहर विकास विभागाच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) नाही.

तथापि, महानगरपालिकेच्या Pre DCR प्रणालीमध्ये विकासकांचा On line प्रस्ताव Run करताना येणाऱ्या त्रुटींची पूर्तता वास्तुविशारदाकडून करुन घेऊन विकास प्रस्ताव अद्यावत सादर करण्यासाठी वास्तुविशारद/प्रतिनिधी व विकासक/प्रतिनिधींनी शहर विकास विभागामध्ये उपअभियंता यांच्या उपस्थितीत अडचणीचे निरसन करुन प्रस्ताव अद्ययावत करण्याची पध्दत प्रचलित आहे. त्यानुसार दिनांक ०७.०१.२०१५ रोजी मे.क्लॅरिएंट केमिकल्स इंडिया लि. चे वास्तुविशारदांचे व विकासकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. परिणामी शहर विकास विभाग व विकासक यांच्या संगनमताची बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.

(४) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन या प्रकरणी कोणत्याही विकासक/प्रतिनिधी यांना पकडण्यात आलेले नाही. मात्र वास्तुविशारद व त्यांचे प्राधिकृत सहाय्यक यांना कार्यालयीन दिवशी दुपारी ०२.०० ते सायंकाळी ०५.३० या वेळेत शहर विकास विभागात प्रवेश अनुज्ञेय राहील असे परिपत्रक सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी दिनांक १२.०२.२०१५ रोजी निर्गमित केले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

बुलेट ट्रेन प्रकल्पास वाद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) जमीन देण्याबाबत

(६२) * ३५२८ ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या टर्मिनल उभारण्याकरिता वांद्रे-कुर्ला संकुलाची जागा देण्याची मागणी केंद्र शासनाने तसेच रेल्वे प्रशासनाने राज्य शासनाकडे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे केली असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टर्मिनससाठी नेमक्या जागेचे स्वरुप व किती जागेची आवश्यकता, याबाबतचा कोणताही उल्लेख रेल्वे प्रशासनाच्या पत्रातील मागणीत नसल्याने व प्राधिकरणाकडे सलग जागा उपलब्ध नसल्याने रेल्वेच्या सदर बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी जमीन देण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने असमर्थता दर्शविली असल्याचेही त्याचसुमारास (माहे डिसेंबर, २०१२) निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे वांद्रे-अहमदाबाद याऐवजी मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस ते नागपूर या मार्गावर सदर बुलेट ट्रेन सुरू करावी, अशी राज्यातील विशेषत: विदर्भवासीय जनतेची मागणी असल्याचेही त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील स्तंभ २ व ३ प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा अथवा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय.
(३) व (४) बुलेट ट्रेनचे नियोजन ही रेल्वे मंत्रालयाशी संबंधित बाब आहे. सद्यस्थितीत रेल्वे मंत्रालय यांनी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन करिता जपानी सल्लागारामार्फत तयार केलेल्या अहवालानुसार बांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी- G Text Block) येथे टर्मिनस प्रस्तावित केला आहे. सदर प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसेच राज्य शासनाची संमती घेण्यात आली नाही. मा.रेल्वे मंत्री केंद्र सरकार यांच्या सोबत ८/१/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत सदर टर्मिनससाठी इतर पर्यायी जागा कुर्ला, वांद्रे किंवा दहीसर येथे करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण/ राज्य शासना मार्फत सुचविले. त्यावर टर्मिनस बाबत पुढील निर्णय तांत्रिक तज्ञांच्या शिफारशीनुसार घेण्यात येईल असे ठरविण्यात आले.

नागपूरच्या दिक्षाभूमिला "अ" वर्ग पर्यटस्थळाचा दर्जा देण्याबाबत.

(६३) * ४७७९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरच्या दिक्षाभुमिला "अ" वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नागपूरच्या दिशाभुमिला ''अ'' किंवा ''ब'' वर्ग तिर्थस्थ/ पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची मागणी शासनास प्राप्त झालेली आहे.
(२) व (३) विभागीय आयुक्त, नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून माहिती/ अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

मुंबई उपनगरातील मालाड येथे एक दुचाकीस्वार पतंगाचा मांजा गळयाला अडकल्याने जखमी झाल्याबाबत

(६४) * २८५१ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील मालाड येथे एक दुचाकीस्वार पतंगाचा मांजा गळयाला अडकून जखमी

झाल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात नेहमीच पंतगोत्सवाच्या दरम्यान मांज्यामुळे काही जणांना जीव गमवावे लागणे तसेच जखमी होण्याच्या घटना घडत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पंतग उडविण्याच्या वा तुटलेला पतंग पकडण्याच्या नादात अनेक दुर्घटनाही होतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पतंगोत्सवाच्या काळात अशा घटना घडू नयेत म्हणून शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दिनांक १५.१.२०१५ रोजी पतंगाचा मांजा गळयाला अडकून एक चुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना बोरीवली येथे घडली आहे.

(२), (३) व (४) मकरसंक्रांतीच्या पूर्वी शाळा, महाविद्यालये येथे प्रत्यक्ष भेटी देवून पतंग उडविताना होणारे गंभीर अपघात अथवा तत्संबंधित गुन्हे याबाबत माहिती देवून सतर्क करण्यात येते. पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोहल्ला समिती व शांतता समिती यांच्या बैठका घेवून पतंगोत्सवाच्या काळात होणाऱ्या दुर्घटनांबाबत सूचना देवून दक्ष केले जाते. तसेच चायनिज अथवा नायलॉन मांज्याऐवजी साध्या मांजाचा वापर करावा, असे आवाहन केले जाते. नायलॉन मांज्याचा वापर होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येते. पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉन मांज्याच्या विक्रीस व वापरास कायमस्वरुपी प्रतिबंध करण्याचे धोरण ठरविण्याची बाब विचाराधीन आहे.

(५) विलंब झालेला नाही.

पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी कमी करण्याबाबत

(६५) * ३६९२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी विठ्ठलवाडी ते वारजे हया रस्त्याच्या मागणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात आंदोलन केले हे खरे आहे काय,

(२) तसेच, विश्रांतीनगर येथील रस्त्यांचे रुंदीकरण व कॅनॉल रस्त्याचे काम केल्यास सदर कोंडी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने पाठपुरावा करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात आले आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) होय.

विश्रांतीनगर हद्दीमधील या रस्त्याचे डी.पी.नुसार १८ मी. एवढे रुंदीकरण व वडगाव बुद्रुक ते पु.ल.देशपांडे उद्यान, पर्वती पर्यंतचा ४.५ कि.मी.लांबीचा कॅनॉल रस्त्याचे काम केल्यास सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

(३) प्रश्न भाग - १ मधील विठ्ठलवाडी ते वारजे या नदीकिना-याच्या रस्त्याचे ब्ल्यु लाईन मध्ये येणारे काम काढून टाकणेबाबत मा. राष्ट्रीय हरित लवाद यांचा दिनांक १४.१.२०१५ रोजीच्या अंतिम निकाल मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२.२.२०१५ अन्वये कायम केला असल्याने, सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

प्रश्न भाग- २ मधील विश्रांतीनगर हद्दीमधील रस्ता पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असून, सदर रस्त्याची सद्यस्थितीमधील रुंदी ६ मी. आहे सन २००८ च्या मान्य विकास आराखडयात नमूद सदर रस्त्यांची रुंदी १८ मी. असून, सदर रस्ता रुंदी साठीची उर्वरित जागा पुणे महानगरपालिकेमार्फत भूसंपादन करुन ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे.

तसेच वडगाव बुद्रुक ते पु.ल.देशपांडे उद्यान, पर्वती पर्यंतच्या मंजूर विकास आराखड्यांमध्ये दर्शविण्यात आलेला ७.५ मी. रुंद व ४५०० मी. लांबीच्या कॅनॉल रस्त्यासाठी महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात रुपये ८८.१२ लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर तरतूद मान्य झाल्यानंतर सदर रस्त्याचे काम करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

मुंबईतील बीडीडी चाळीचा पुनर्विकास करण्याबाबत

(६६) * ३५६४ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.अनिल परब : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बीडीडी चाळीचा पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चाळींचा खाजगी बिल्डरांकडून पुनर्विकास केल्यास रहिवाशांना ४५० चौ.फुटांचे घर मिळणार आहे, तसेच चाळींचा म्हाडाने पुनर्विकास केल्यास चार एफएसआय मिळणार असून रहिवाशांना १५ टक्के अतिरिक्त क्षेत्रफळ मिळून त्यांना ५२५ चौ.फुटाने घर

मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीडीडी चाळीचा पुनर्विकास प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१), (२) व (३) मुंबई विकास विभागामार्फत औद्योगिक कामगारांच्या निवासाची सोय म्हणून वरळी, नायगांव, डिलाईल रोड, (ना.म.जोशी मार्ग) व शिवडी येथे बांधण्यात आलेल्या इमारतींपैकी वरळी, नायगांव व ना.म.जोशी मार्ग येथील जमिनी राज्य शासनाच्या मालकीच्या असून शिवडी येथील जमीन मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची आहे. सदरहू चाळींची पुनर्बांधणी / पुनर्विकास करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोनारी (ता.उरण,जि.रायगड) येथील गावातील मैदानावर पोलीस स्टेशन बांधण्याचा घेतलेला निर्णय

(६७) * ३८७६ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६४० ला दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनारी (ता.उरण, जि.रायगड) येथील ग्रामस्थांच्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी २ एकर जागा जे.एन.पी.टी.ने उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले त्यानुसार जे.एन.पी.टी.ने कोणती कार्यवाही केली आहे,
(२) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) जे.एन.पी.टी. मार्फत ग्रामस्थांनी विरोध केलेल्या जागेवर पोलिस स्टेशन उभारणीच्या कामास सुरुवात झाली आहे किंवा कसे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) सोनारी गावाजवळील पोलीस ठाण्यास देण्यात आलेल्या जागेशेजारी ग्रामस्थांच्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी २ एकर जागा देण्याबाबत जे.एन.पी.टी. प्रशासनाशी पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) न्हावाशेवा पोलीस ठाण्याची नवीन इमारत बांधण्यासाठी जे.एन.पी.टी प्रशासनाकडून भराव करण्याचे काम पूर्ण झालेले आहे. सदर ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन उभारणीच्या कामात जे.एन.पी.टी प्रशासनाकडून सुरुवात केलेली नाही.

मुंबईतील जोगेश्वरी (पू.) येथे बृहन्मुंबई महापालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या ट्रामा केअर सेंटर रुग्णालयात अत्यावशक साहित्य सुविधांचा असलेला अभाव

(६८) * ५०३३ श्री.संदिप बाजोरिया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जोगेश्वरी (पू.) येथे बृहन्मुंबई महापालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या सुसज्ज ट्रामा

केअर सेंटर रुग्णालयात सीटी स्कॅन, वेन्टीलेटर मशिन इत्यादी अत्यावश्यक साहित्य सुविधांचा अभाव असल्याने तसेच रुग्णालयातील अधीक्षक व इतर डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील उपरोक्त साहित्य सुविधांच्या अभावामुळे विविध अपघातग्रस्त रुग्णांना कुपर रुग्णालयात पाठविण्यात येते, या कारणास्तव अनेक वेळा रुग्णांचा कुपर रुग्णालयात नेईपर्यंत मृत्यु होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालयात अत्याधुनिक साहित्य सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर सेंटर रुग्णालयात व्हेंटीलेटर, सोनोग्राफी, एक्स-रे इत्यादी उपलब्ध आहेत.

सी.टी.स्कॅनः सी.टी.स्कॅन मशिन खरेदी करण्याची प्रक्रिया केंद्रीय खरेदीविभागातर्फे कार्यान्वित आहे. तात्पुरती व्यवस्था म्हणून खाजगी केद्राबरोबर एमओयु करून महापालिकेच्या दरामध्ये सी.टी.स्कॅन करून घेण्यात येतात.

एम.आर.आय.स्कॅनः एम.आर.आय. सुविधा सार्वजनिक खाजगी सहभाग उपक्रमांतर्गत निवड करण्यात आलेल्या के.आर.एस.एन.ए.ए. डायग्नोस्टिक प्रा.लि. या संस्थेमार्फत पुरविण्यात येणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २९.११.२०१५ रोजी नियुक्तपत्र देण्यात आले असून सदर संस्थेमार्फत एम.आर.आय. स्कॅन सुविधा ६ महिन्यात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

(२) ज्या रुग्णांना अतिविशेष सेवा व सुविधांचे तसेच तज्ञ डॉक्टरांची गरज भासते अशा रुग्णांना महानगरपालिका ट्रान्सफर प्राटोकॉल नुसार वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नीत मोठया रुग्णालयांमध्ये नेण्यात येते.

(३) वरील प्रश्न भाग १ मधील दिलेल्या उत्तराप्रमाणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर गावातील गटाराच्या निकृष्ट बांधकामाबाबत

(६९) * ३००४ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर गावातील गटाराचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याने प्राप्त तक्रारीनुसार मुंबईच्या एका ठेकेदाराला महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाचे बांधकामासंदर्भात उक्त कंत्राटदारांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे अंशतः खरे आहे.

संबंधित कंत्राटदारास मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पुढील निविदा भरण्यास महानगरपालिकेकडून मज्जाव करण्यात आला आहे.

(२) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर गाव रेतीबंदर ते मॉडर्न झोपडपट्टीपर्यंतच्या रस्त्यालगत मटार बांधकामाचे कंत्राट मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून मे.महेश्वर बिल्डर्स यांना देण्यात आले होते. मात्र, या कंत्राटदाराकडून निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्याने संबंधित कंत्राटदारास पालिकेकडून नोटीस बजावून सदर काम नव्याने चांगल्या प्रतीचे करुन घेण्यात आले आहे.

तसेच दरम्यानच्या कालावधीत महानगरपालिकेकडून या कंत्राटदाराची डिजीटल सिग्नेचर लॉक करुन पुढील निविदा भरण्यास मनाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकास करावयाचा असल्यास राज्य सरकारबरोबर लेखी करार तसेच इमारतीचे बांधकाम विहीत वेळेत पूर्ण करण्याबाबत

(७०) * ३५०३ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकास करावयाचा असल्यास राज्य सरकारबरोबर लेखी करार तसेच इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण न झाल्यास अशा विकासकावर कारवाई करणार असल्याचे मा.गृहनिर्माण मंत्री यांनी निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) व (२) मुंबईतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींनुसार केला जातो.

विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३३(७) मधील तरतुदीनुसार मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्रचनेकरीता म्हाडामार्फत विकासक किंवा मुख्य प्रवर्तक यांना ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. त्यानंतर विकासकाने योजनेच्या नकाशांना मंजूरी घेवून सहा महिन्यांच्या आत पुनर्रचनेचे काम सुरु करुन १८-२४ महिन्यांच्या आत बांधकाम पुर्ण करण्यात यावे व भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ७ दिवसांच्या आत भाडेकरु-रहिवाशी याचे

म्हाडामार्फत पुनर्वसन करण्यात यावे, असे गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १,६,२००५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानूसार म्हाडामार्फत कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील सुरक्षा बलाच्या जवानांवर होत असलेला अन्याय

(७१) * २७४१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत झालेल्या अतिरेकी हल्यानंतर शासनाने महाराष्ट्र शासन सुरक्षा मंडळाची स्थापना करुन सुरक्षा बलाची दिनांक २६ नोव्हेंबर २००८ रोजी वा त्या सुमारास निर्मिती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सुरक्षा बलातील जवांनाना नियमानुसार विशेष पोलिस अधिकारी असा दर्जा देताना विनावॉरंट अटक करण्याचा अधिकार दिलेला असताना त्यांची नेमणूक मुंबईतील मंदीरे, महामार्ग, उड्डाणपुल, ओ.एन.जी.सी., जे.एन.पी.टी, बँका इ. ठिकाणी "वॉचमन" म्हणून केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या ठिकाणी हे जवान सेवा देण्यासाठी रूजू असतात, त्या आस्थापनेकडून रू २० ते २१ हजार इतका पगार दिला जात असून त्यांना दरमहा वेतन पावती दिली जात नाही, हे खरे आहे काय,
(४) उपरोक्त बाब शासनाच्या निर्दशनास आणण्यासाठी नागपूर हिवाळी आधिवेशात या जवानानी काढलेल्या मोर्चाचे प्रतिनिधी मंडळ गृहखात्यांच्या सचिवांना भेटून आपली व्यथा सागितली, त्या प्रतिनिधी मंडळातील ज्या जवानांची नावे देण्यात आली होती त्या सर्व जवानांना शिस्त मोडल्याचा आरोप करत निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच निलंबित करण्यात आलेल्या सर्व जवानांना पुन्हा सेवेत रूजू करून घेवून त्यांचे निलंबित काळातील वेतन विनाविलंब देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे. शासन अधिसुचना दिनांक १९.४.२०१० अन्वये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची निर्मिती करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदीनुसार सुरक्षा दल गठित करण्यात आले आले.
(२) सदर अधिनियमातील तरतुदीनुसार सुरक्षा दलातील सदस्यांना विशेष पोलीस अधिकारी असा दर्जा देण्यात आला असून संबंधित आस्थापनांवर त्यांची नेमणुक "सुरक्षा दलाचे सदस्य" अशी केली जाते.
(३) हे खरे नाही.
(४) महामंडळातील सुरक्षा दलातील सदस्यांना त्यांच्या नियुक्ती पत्रातील अटी व शर्तीनुसार मोर्चा काढणे अथवा संघटना स्थापन करणे इ. करीता प्रतिबंधीत केलेले आहे. तथापि त्या अटी

व शर्तीचे उल्लंघन केलेल्या सदस्यांपैकी मोर्चाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या ३ सदस्यांना कंत्राटी स्वरुपाच्या सेवेतून काढून टाकले आहे आणि ३ सदस्यांना सक्त ताकीद दिली आहे.

(५) व (६) महामंडळाच्या अटी व शर्तीचा भंग केलेल्या सदस्यांना निलंबित केलेले नाही. तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील सुरक्षा दलातील ३ सदस्यांना निलंबित करण्यात आले नसुन त्यांची कंत्राटी स्वरुपाची सेवा खंडीत करण्यात आली असल्यामुळे त्यांना पुन्हा कंत्राटी सेवेत रुजू करुन घेवून त्यांचे निलंबित काळातील वेतन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महापालिकेने सन २०१५ मध्ये शहरातील मालमत्ताधारकांना मलजल लाभ कर, पाणी लाभ कर आणि पथकर लावण्याचा घेतलेला निर्णय

(७२) * ३८३३ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महापालिकेने सन २०१५ मध्ये शहरातील मालमत्ताधारकांना मलजल लाभ कर, पाणी लाभ कर आणि पथकर लावण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर करामुळे मालमत्ताधारकांवर जादा आर्थिक बोजा पडू नये म्हणून कोणती कार्यवाही केली आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधीत महानगरपालिका त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या मालमत्ताधारकांवर नवीन कर लावणे, कर वाढविणे अथवा कमी करण्यास सक्षम असून, त्यानुसार उक्त अधिनियमातील कलम १२८(अ) व ९९ नुसार नागपूर महानगरपालिकेडून असा कर लावण्याचा प्रस्ताव तयार केला असून, सदरचा प्रस्ताव महानगरपालिका सभागृहापुढे धोरणात्मक निर्णयास्तव प्रलंबित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर शहरातील रस्त्यावरील सिग्नल यंत्रणा मोठया प्रमाणात बंद असल्याबाबत

(७३) * ४९३२ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात रस्त्यावरील सिग्नल मोठया प्रमाणात बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, शहरातील नागरिकांची प्रवासात गैरसोय होवू नये तसेच अपघात घडू नयेत म्हणून सिग्नल यंत्रणा पूर्ववत सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही तथापि एकूण १३ सिग्लपैकी १० सिग्नल सुरु आहेत व ३ सिग्नल बंद आहेत.

(२) तीन बंद सिग्नलपैकी एक सिग्नल रस्त्याचे विकास काम हाती घेतल्यामुळे आणि दोन सिग्नल रस्त्याचे काम करताना केबलमध्ये बिघाड झाल्यामुळे बंद आहेत.

(३) सिग्नल व्यवस्था सुरळीत राहण्याकरिता व देखभाल दुरुस्तीसाठी मक्तेदारास योग्य ते नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासातून सरप्लस एफएसआयमधून म्हाडाच्या इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला घरे दिली नसल्याबाबत

(७४) * २९८३ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासातून सरप्लस एफएसआयमधून म्हाडाच्या इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला घरे देणे बंधनकारक असतांना ३३ विकासकांपैकी २९ विकासकांनी घरे उपलब्ध करुन दिली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकासकांपैकी फक्त १२ विकासकांना मालमत्ता जप्त करण्याच्या नोटीसा म्हाडाने पाठविल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील मालमत्तांची आणि बँक खात्याचा तपशील म्हाडाकडे उपलब्ध नसल्याने विकासकांवर कोणत्या स्वरूपाची कारवाई करावी असा प्रश्न म्हाडा अधिकाऱ्यांना पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत म्हाडाने विकासकांकडून किती घरे उपलब्ध करून घेतली आहेत, तसेच जी घरे विकासकांकडून म्हाडांकडे सुपूर्द केलेली नाहीत त्या विकासकांची नावे काय आहेत व त्या विकासकांची मालमत्ता जप्त करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) सन २०११ मध्ये मुंबई शहर बेटावरील जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या

पुनर्विकासानंतर म्हाडास देय असलले अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास दिलेले नाही अशी ३३ प्रकरणे असल्याचे निदर्शनास आले.

(२), (३) व (४) गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १५.१०.२०१२ च्या पत्राद्वारे सदर ३३ प्रकरणांमध्ये कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सदर ३३ प्रकरणांमध्ये दोन प्रकरणे विक्रीयुक्त घटकाच्या इमारतीचे बांधकाम अद्याप सुरु झाले नसल्याने, एक प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने तर एका प्रकरणामध्ये विकासकाने त्याचेविरुध्द गुन्हा दाखल होण्यापूर्वीच अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केल्याने उर्विरत २९ प्रकरणांमध्ये म्हाडामार्फत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सदर प्रकरणांमध्ये मुंबई आर्थिक गून्हे अन्वेषण विभागातर्फे तपास सुरु आहे. सदर २९ प्रकरणांपैकी दंडात्मक रक्कम प्राधिकरणास प्राप्त न झाल्याने १२ प्रकरणांमध्ये संबंधित विकासंकास नोटीस देण्यात आल्या आहेत तर उर्वरित विकासकांवर नोटीस बजावण्याची कार्यवाही म्हाडामार्फत करण्यात येत आहे. या विकासकांना हरकत प्रमाणपत्र धारकांकडून आतापर्यंत १२४ सदनिका म्हाडास प्राप्त झाल्या आहेत, म्हाडाकडे अंशत/पूर्णतः घरे सुपूर्द न केलेल्या विकासकांना हरकत प्रमाणपत्रधारकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :-

हाजी अबुबकर हाजी मुसा, मे.पारस इंटरप्रायजेस, द बलवास इस्टेट, श्री.आय.ए.पारेख, श्री.अशोक मुरारका, मोहम्मद सलीम अब्दुल कयुम कोडीया, मे सुमेर ॲण्ड असो., मे.एम.आय.इंटरप्रायजेस, ट्रस्टी हाजी उमेर सोब ट्रस्ट, श्री.आय.डी.पारेख, मे अरविद प्रॉपर्टीज, मे.ऑस्कर बिल्डर, अलाईड होल्डींग लि., मे.मोहम्मद मुन्शी ॲण्ड कं., मे.स्नेहा बिल्डर्स, मे. सनी कन्स्ट्रक्श्न कं., श्री.उदय दिघे, हरिष दामजी निशार, श्री.बी.एस.जी.किणी, श्री.आर.आर.जाधव, श्री.नलिनकुमार एम.शाह, राज ॲण्ड फारेद अहमद ,खान, मे. गायत्री एन्टरप्रायजेस, सिमको बिल्डर्स, मे.सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन प्रा.लि.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगर परिषद अंतर्गत बाराव्या वित्त आयोगाच्या अनुदानातून खरेदी करण्यात आलेली नाला क्लीनर मशीन विनावापर पडून असल्याची बाब

(७५) * ५१३० श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगर परिषद अंतर्गत बाराव्या वित्त आयोगाच्या अनुदानातून खरेदी करण्यात आलेली नाला क्लीनर मशीन विनावापर पडून असल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर मशीन उपलब्ध होवूनही वापर न करण्याची कारणे कोणती आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

महाड नजिकच्या गाधारपाले गावाच्या हद्दीत झालेल्या धडकेत दोन जण ठार तर तीनजण जखमी झाल्याच्या घटनेबाबत

(७६) * ४१२२ श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - गोवा महामार्गावर दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लक्झरी बस व जीप यांच्या महाड नजिकच्या गाधारपाले गावाच्या हद्दीत झालेल्या धडकेत दोन जण ठार तर तीनजण जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर घटनेत मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे. तथापि सदर घटना दिनांक २.१.२०१५ रोजी घडली आहे.

(२) व (३) या प्रकरणी पोलीसांनी केलेल्या चौकशीमध्ये सदर अपघात लक्झरी बस चालकाच्या चुकीमुळे घडलेला असल्याचे आढळून आले आहे. लक्झरी बस चालकाविरुद्ध महाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२/२०१५, भा.दं.वि.सं. ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का.कलम १८४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना नुकसान भरपाई मिळण्याकरीता मोटार दावा न्यायाधिकरणास आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील महापालिकेच्या पुलांचा सद्यस्थितीचा डाटा जमा करण्यासाठी महापालिकेने हाती घेतलेले मिशन ब्रिज

(७७) * ३०७४ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महापालिकेच्या पुलांचा सद्यस्थितीचा डाटा जमा करण्यासाठी महापालिकेने मिशन ब्रिज हाती घेतले असून मुंबईतील २७० पुलांची पाहणी करून सर्वेक्षण करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील किती पुलांचे आतापर्यंत सर्वेक्षण पुर्ण झाले आहे,

(३) तसेच या कामाकरिता निविदा काढल्या आहेत काय, असल्यास, आतापर्यंत किती निविदा प्राप्त झाल्या आहे,
(४) असल्यास, सदर काम कोणत्या कंपनीला देण्यात येणार आहे व त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबईतील २७४ पुलाचे सर्वेक्षण करुन आवश्यकतेनुसार त्यांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्याबाबत उपाययोजना तयार करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतले आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया सुरु असल्याने सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यात आलेले नाही.
(३) निविदा प्रक्रिया सुरु असून आतापर्यंत एकूण ९ निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत.
(४) निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे संस्था निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच सदर कामासाठी कार्यालयीन अंदाजित खर्च रु. २.०८ कोटी इतका आहे.

मुंबई येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील अंधेरी,जोगेश्वरी आणि सांताक्रुझ याठिकाणावर महिलांसाठी प्रसाधनगृहे बांधण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(७८) * ४४०६ श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील अंधेरी, जोगेश्वरी आणि सांताक्रुझ या ठिकाणावर महिलांसाठी प्रसाधनगृहे बांधण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी महिलांसाठी प्रसाधनगृहे लवकरात लवकर बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) मुंबई येथील पश्विम द्रुतगती महामार्गावरील अंधेरी, जोगेश्वरी आणि सांताक्रुझ या ठिकाणांवर महिला व पुरुषांकरिता ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर एकूण ६ ठिकाणी स्वच्छतागृह बांधण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले. या ६ पैकी एक प्रसाधनगृह सुरु करण्यात आले आहे. ४ प्रसाधनगृहे नोंदणीकृत महिला बचत गटांना चालविण्यासाठी ठेवण्यात आली आहेत. त्यासाठी ४ संस्थांची निवड करण्यात आली असून सदर ४ व उर्वरित १ अशी एकूण ५ प्रसाधनगृहे लवकरच सुरु करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शहरी भागातील गरीब झोपडपट्टीवासीयांसाठी घरे देण्याकरीता राजीव गांधी आवास योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(७९) * ३३४९ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागातील गरीब झोपडपट्टीवासीयांसाठी घरे देण्याकरीता राजीव गांधी आवास योजना लागू केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ४६ शहरांमधील २२ लाख झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याच्या राजीव गांधी आवास योजना निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राजीव गांधी आवास योजनेसाठी निधी उपलब्ध करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) केंद्र शासनाने शहरी भागातील झोपडपट्टीवासियांसाठी केंद्र सहाय्यित राजीव आवास योजनेची घोषणा सन २०११ मध्ये केली होती. सदर योजनेची सुधारीत मार्गदर्शक तत्वे सप्टेंबर, २०१३ मध्ये केंद्र शासनाने निर्गमित केली आहेत. त्यानुसार राजीव आवास योजनेचा कालावधी २०१३-२०२२ असा आहे. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील ४६ नागरी स्वराज्य संस्थांचा राजीव आवास योजनेमध्ये समावेश प्रस्तावित करण्यास केंद्र शासनाने संमती दर्शविली आहे. या शहरांमध्ये राजीव आवास योजनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी झोपडपट्टीमुक्त शहर नियोजन आराखडा तयार करणे, झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण, जीआयएस /एमआयएस करणे, इत्यादी कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) राजीव आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने आर्थिक, संसाधनाची उपलब्धता, योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी लागणारा निधी, उपलब्ध होऊ शकणारा निधी इ. बाबींसंदर्भातील मुल्यांकन करण्यात येत आहे. दरम्यान केंद्र शासनाने ''२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे'' हे धोरण घोषित केले असून याबाबतची मार्गदर्शक तत्वे केंद्र शासनाकडून प्राप्त होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई पश्चिम उपनगरातील गोरेगाव येथील पी/दक्षिण विभागातील झाडांची तोड केल्याबाबत

(८०) * ३६२१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील गोरेगाव येथील पी/दक्षिण विभागातील इनॉर्बिट मॉल व मालाड मधील पी/उत्तर विभागातील इन्फिनिटी मॉलच्या जमिनीवरील एकूण ३०० झाडांची तोड तेथील विकासकांकडून माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने सदर विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/दक्षिण विभागातील इनऑर्बिट मॉलच्या पाठीमागे न.भू.क्र. १४०६३ अ/२५ अ या मोकळया भूखंडावरील सुमारे १२५-१५० तसेच पी/उत्तर विभागातील इन्फिनीटी मॉलच्या पाठीमागे न.भू.क्र. १४०६३ अ/७ या मोकळया भूखंडावरील सुमारे ११२ सुबाभुळ या जातीच्या पावसाळयात वाढलेल्या झाडांची अनधिकृत तोड माहे जानेवारी, २०१५ मध्ये करण्यात आली हे खरे आहे.

(२) व (३) या संबंधी बांगुर नगर लिंक रोड पोलिस ठाणे (मालाड/पश्चिम) येथे अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांमार्फत मा. न्यायालयाकडून गुन्हा दाखल करण्याबाबत परवानगी घेण्यात येत असून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील तपास करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वेगवेगळया घटना घडून या महामार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

(८१) * ३१७५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अनेकदा वेगवेगळया घटना घडून या महामार्गावर दोन तास कधी कधी त्याही पेक्षा अधिक काळ वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गावर वांरवार विविध होत असलेल्या घटना थांबविण्यासाठी व वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शासनाने कोणती खास उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) माहे जानेवारी, २०१५ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती, हे खरे आहे.

(२) महामार्गावर होणारे अपघात टाळण्यासाठी आणि वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर महामार्ग पोलिसांचे पळस्पे, बोरघाट, खंडाळा व वडगाव येथे महामार्ग पोलीस मदत केंद्रे कार्यरत असून तेथील अधिकारी व कर्मचारी महामार्गावर गस्त घालून वाहतूकीचे नियमन करतात.

२) महामार्ग पोलीस व आय.आर.बी.कंपनींचे हेल्पलाईन नंबर उपलब्ध करुन देण्यात आले असून सदर हेल्पलाईन नंबरचे फलक महामार्गावर ठिकठिकाणी लावण्यात आले आहेत.

३) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर आधुनिक सर्व्हेलन्स सिस्टीम बसविण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या विचाराधीन आहे.

४) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर विशेषतः बोरघाटमधील घाट रस्त्यावर वाहने बंद पडणे व इतर घटनांमध्ये वाहनांचे अपघात होऊन वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन नये म्हणून महामार्ग पोलीस केंद्र व आय.आर.बी. मार्फत प्रत्येकी एक क्रेन तैनात ठेवली आहे.

५) द्रुतगती महामार्गावर वेग मर्यादा पाळणे, लेनची शिस्त पाळणे व महामार्गावर वाहने न थांबविण्याबाबतचे सूचना फलक लावण्यात आलेले आहेत. द्रुतगती महामार्गावर सिमेंटच्या कठड्यावर डेलिनेटर लावण्यात आले आहेत. अपघातप्रवण क्षेत्रात रस्ते दुभाजकांवर ब्रिफेन वायर रोप लावण्यात आलेले आहेत. साईड कठडे तयार करुन घेण्यात आलेले आहेत.

६) जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर ज्या ठिकाणी द्रुतगती महामार्गाला जोडला जातो. त्या ठिकाणी जड अवजड वाहनांना मुंबईच्या दिशेने जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

७) अपघातप्रवण क्षेत्रामध्ये वाहनचालकांनी घ्यावयाच्या काळजीबाबत सूचना फलक लावण्यात आलेले आहेत.

८) दरड कोसळून अपघात होऊ नये, मोकाट जनावरे द्रुतगती महामार्गावर येऊ नये याकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत आय.आर.बी.कंपनीकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

९) महामार्गावर एखादे वाहन बंद पडल्यास सदरचे वाहन क्रेनच्या सहाय्याने बाजूला घेऊन त्याच्या मागे-पुढे रिप्लेक्टर कोन लावून अपघात होणार नाही याची काळजी घेतली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील राज्य राखीव पोलीस दलातील कर्मचा-यांची जिल्हा पोलीस दलात बदली देण्याबाबत

(८२) * ३१४६ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य राखीव पोलिस दलातील कर्मचारी १० वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर जिल्हा पोलिस दलात बदलून जाण्यास पात्र असतात यासाठी जिल्हा पोलिस दलात त्यांच्यासाठी १० टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात तरी देखील सदर कर्मचा-यांच्या बदल्या करण्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या समादेशक गट क्र. १ ते १६ या कार्यालयामध्ये मोठया प्रमाणावर पोलीस कर्मचारी संवर्गातील विविध पदे रिक्त असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्ताकरिता पोलीस कर्मचारी पुरविणेकरिता अडचणीचे होते. त्यामुळे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मान्यतेने दिनांक ०३.०५.२०१४ अन्वये सन २०१४ या एक वर्षासाठी जिल्हा बदल्या न करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर निर्णयाचे विरुध्द राज्य राखीव पोलीस बलातील एकूण १५ पोलीस कर्मचारी यांनी मॅट कोर्टात क्र. ४४६/२०१४ प्रमाणे दावा दाखल केला, सदर दाव्याचा निकाल दिनांक ०९.०७.२०१४ रोजी झाला. सदर निकालामध्ये मॅट कोर्ट यांनी अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना काही प्रमाणात जिल्हा बदल्या कराव्यात असे निर्देश दिले. सदर निर्णयामध्ये मॅट कोर्टानी अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल कार्यालयाच्या कोणत्याही बाबी विचारात न घेता निकाल दिल्यामुळे जिल्हा बदली-२०१४ प्रकरणी राज्य राखीव पोलीस बल कार्यालयाने शासनाच्या परवानगीने क्र. १०४९२/२०१४ प्रमाणे उच्च न्यायालयात दावा दाखल केला. उच्च न्यायालयाने दिनांक २३.०२.२०१५ रोजी झालेल्या सुनावणीचे तारखेस अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल यांना दोन आठवडयामध्ये जिल्हा बदल्या करण्याबाबत समक्ष निर्देश दिलेले आहेत. उच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस कर्मचाऱ्यांची जिल्हा बदली करण्याची कार्यवाही अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव बल कार्यालयात सुरु आहे.

राज्यातील गडचिरोली, नंदुरबार व वर्धा या जिल्ह्यातील सहायक धर्मादाय आयुक्तांची रिक्त पदे भरण्याबाबत

(८३) * ४२७५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ७८१ ला दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गडचिरोली, नंदूरबार व वर्धा या तीन जिल्ह्यातील सहायक धर्मादाय आयुक्तांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) सहायक धर्मादाय आयुक्त संवर्गातील गडचिरोली, नंदूरबार व वर्धा या तीन जिल्हयातील रिक्त पदावर न्यायिक सेवेतील अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्याची विनंती मा.महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाकडे सहायक धर्मादाय आयुक्त संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्लोड (जि.औरंगाबाद) परिसरात मोठयाप्रमाणात होणा-या अवैध प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही

(८४) * ५६३९ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) परिसरात मोठया प्रमाणात अवैध प्रवासी वाहतूक होत असल्याने अनेकदा लहान मोठे अपघात होत असूनही पोलीसांचे मात्र या अवैध प्रवासी वाहतुकीकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त भागातील अवैध प्रवासी वाहतूक त्वरीत बंद करण्याबाबत तसेच अशा वाहनचालकावर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीसांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अवैध प्रवासी वाहतुकीविरुध्द पोलीसांनी कारवाई केलेली आहे. सन २०१२, २०१३ व २०१४ मध्ये सिल्लोड परिसरात अनुक्रमे ४६, ३९ व ३३ अपघात झालेले आहेत.

सिल्लोड परिसरामध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पोलीस ठाणे, सिल्लोड शहर; पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण आणि वाहतूक शाखा औरंगाबाद ग्रामीण यांच्याकडून वारंवार व संयुक्त मोहिम राबवून जानेवारी, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंत ६२७ केसेस करुन रु. १२,४९,९००/- दंड वसूल केला आहे. या कालावधीत ५२ वाहनांचे परवाने निलंबित करण्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयास प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत आणि २२ वाहने ७/१० दिवसांकरीता निलंबित करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सी आर झेड नियमावली अंतर्गत बंधनकारक असलेल्या मंजूरीतून सवलत देवूनही सागरी पोलीस चौक्यांचे बांधकाम प्रलंबित असल्याची बाब

(८५) * ५७४९ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सी आर झेड नियमावली अंतर्गत बंधनकारक असलेल्या मंजूरीतून सागरी पोलीस ठाण्यांना सवलत देण्याच्या दिनांक ६ जानेवारी २०११ रोजीच्या अधिसूचनेनंतरही अर्नाळा, केळवा, दादर, सागरी-१, सागरी-२, मालाड-मढ, कफ परेड-गीतानगर, सांताक्रुझ इत्यादी सागरी पोलीस चौक्यांचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सागरी सुरक्षेच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अर्नाळा व केळवा (जि.पालघर) आणि मुंबई सागरी-१ येथील पोलीस ठाण्याच्या बांधकामाची टेंडर प्रक्रिया महाराष्ट्र राज्य पोलीस महामंडळाकडून राबविण्यात येत आहे.

दादर (जि.रायगड) येथील जागा हरित-२ मधून हरित-१ मध्ये वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मुंबई सागरी-२, मालाड-मढ चेकपोस्ट आणि सांताक्रुझ पोलीस चौकीकरिता जागा ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

कफ परेड-गीतानगर येथील चेकपोस्टकरिता जागा उपलब्ध झाली असून, निधीच्या

उपलब्धतेनुसार बांधकाम करण्यात येत आहे.
(२) व (३) सागरी सुरक्षेसाठी ६९ बोटी उपलब्ध केल्या असून सागरी जिल्ह्यांमध्ये ४३ सागरी पोलीस ठाणे व ९१ चेकपोस्ट कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व मुंबई उपनगरातील म्हाडाच्या मोकळ्या भुखंडावर करण्यात आलेले अतिक्रमण हटवून त्यावर गरीब व सर्वसाधारण नागरिकांसाठी गृहप्रकल्प उभारण्याबाबत

(८६) * ३८०१ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामराव वडकुते, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व मुंबई उपनगरात म्हाडाच्या मोकळया भूखंडावर म्हाडाने बांधकाम न केल्यामुळे करण्यात आलेले अतिक्रमण हटवून त्यावर गरीब व सर्वसाधारण नागरिकांसाठी गृहप्रकल्प उभारण्याकडे म्हाडा दुर्लक्ष करित असल्यामुळे या जमिनीचा पुनर्विकास प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील पहाडी गोरेगाव येथे म्हाडाचा १० एकराचा भूखंड असून म्हाडाचे त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्याठिकाणी झोपडपट्टयांनी अतिक्रमण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भुखंडावरील अतिक्रमणे निष्कासित करुन त्या भुखंडाचा पुनर्विकास करुन नागरिकांसाठी स्वस्त दरात घरे उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच अतिक्रमण निष्कासित करण्यास विलंब करणा-या म्हाडा अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) म्हाडाच्या मालकीची मोकळी जमिन ज्या-ज्या ठिकाणी आहे, त्या जागेवर होणारे अतिक्रमण वेळोवेळी निष्कासित करण्यात येते. सदर भूखंडास सुरक्षिततेच्या दृष्टीने कुंपण घालण्यात येते. योग्य मोकळ्या भूखंडावर विविध उत्पन्न गटातील सर्वसामान्य नागरिकांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्यात येते.
(२) हे खरे नाही. गोरेगांव (प) येथील मौजे पहाडी येथील स.क्र.२९ (पै) न.भू.क्र.५० (अ) या जमिनीच्या मालकी हक्काबाबत प्रश्न निर्माण होऊन सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे त्या भुखंडावर म्हाडास गृहनिर्माण प्रकल्प योजना राबविता आलेली नाही.

तथापि, या मोकळ्या भूखंडावर होणारे अतिक्रमण वेळोवेळी निष्कासित करण्यात आले असून सदर भूखंडास अंशतः पत्र्याचे कुंपन घालण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय समोरील क्रीडा भवनात झालेल्या आर्थिक घोटळ्याची चौकशी करण्याबाबत

(८७) * ३७९६ श्री.विजय गिरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय समोरील मोक्याच्या ठिकाणी असलेले क्रीडा भवनाला सिल ठोकण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय हा क्रीडा भवनात झालेल्या आर्थिक घोटाळयामुळे घेण्यात आला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घेतलेल्या निर्णयानूसार घोटाळा करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर क्रीडा भवनाच्या आर्थिक बाबतीत तक्रार प्राप्त झाली असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांवर बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.

नाशिक क्षेत्रविकास प्राधिकरण स्थापन करण्याबाबत

(८८) * ५२७२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७७४ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ७४ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने नाशिक महानगर क्षेत्र घोषित करण्यात आल्यानुसार सदर क्षेत्रासाठी महानगर नियोजन समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने सदर समितीवर निवडणुकीच्या माध्यमातून नियुक्त करावयाच्या सदस्यांकरीता निवडणूक घेण्यासाठी निवडणुकीचा दिनांक अधिसूचीत करण्याच्या विचाराधीन बाबींवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक क्षेत्रविकास प्राधिकरण गठीत करण्याविषयी निवडणूक घेणे इत्यादीबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तत्वत: मान्यता देण्यात आलेल्या विकास कामांच्या आराखडयात अंतर्भूत कामांसाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे काय,

तसेच सदर आराखड्यातील क्षेत्रीय स्तरावरुन सुरु असलेल्या कामांची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाशिक महानगर क्षेत्रासाठी महानगर नियोजन समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने सदर समितीवर निवडणूकीच्या माध्यमातून नियुक्त करावयाच्या सदस्यांकरीता घ्यावयाचा निवडणूकांसाठी आयुक्त, नाशिक विभाग यांनी सादर केलेल्या निवडणूकीचा दिनांक अधिसुचित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.
(२) नाशिक महानगर नियोजन समिती स्थापित झाल्यानंतरच नाशिक क्षेत्र विकास प्राधिकरण गठीत करण्याविषयी पुढील निर्णय येणे उचित राहील अशी शासनाची भूमिका आहे.
(३) आगामी सिंहस्थ कुंभमेळयाचे आयोजन व अंमलबजावणीसाठी निधी मिळण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडे पाठपुरवठा सुरु आहे. सिंहस्थ कुंभमेळयाचे आयोजन व अंमलबजावणी करीता मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखालील शिखर समितीने मान्यता दिलेल्या आराखडयातील कायमस्वरुपी कामे मार्च २०१५ अखेर व तात्पुरत्या स्वरुपातील कामे कामाच्या स्वरुपानुसार जुन २०१५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच याबाबत शिखर समितीने व उच्च स्तरीय समितीने वेळोवेळी घेतलेल्या व घेतल्या जाणाऱ्या निर्णयाची कालबध्द व यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याच्या हेतूने अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

नागपूरात वर्षभरात बालिका, तरुणी व महिला वरील अत्याचार
विनयभंग आणि बलात्काराच्या घटनांमध्ये झालेली वाढ

(८९) * ४००७ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरात वर्षभरात बालिका, तरुणी व महिलावरील अत्याचार, बलात्कार तसेच विनयभंग यासारख्या घटना सातत्याने घडतच असून घटनांची आकडेवारी वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासना मार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अत्याचार, बलात्कार करणाऱ्यांवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) नागपूर शहरामध्ये गेल्या वर्षभरात महिलांवरील झालेल्या अत्याचार, बलात्कार तसेच विनयभंगाच्या घटनांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

	सन २०१३			सन २०१४		
	दाखल गुन्हे	निकाली गुन्हे	प्रलंबित गुन्हे	दाखल गुन्हे	निकाली गुन्हे	प्रलंबित गुन्हे

अपहरण	११८	९६	२२	१४५	११६	२९
बलात्कार	९०	९०	००	११६	११३	०३
विनयभंग	२०९	२०१	०८	२७९	२७१	०८
हुंडाबळी	२१९	२१९	००	२५४	२५४	००
एकूण	६३६	६०६	३०	७९४	७५४	४०

प्राप्त तक्रारीची तात्काळ दाखल घेऊन गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक करण्याची कारवाई करण्यात येते. उपरोक्त गुन्ह्यांस अटकाव करण्याकरीता शासनामार्फत खालील विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१) विविध पथके : चैन स्नॅचिंग, घरफोडी, महिलांविरुध्द अत्याचार रोखण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरीकांसाठी वेगवेगळी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

२) स्कुटी पेट्रोलिंग : महिला पोलीस कर्मचाऱ्यांना स्कुटी सुझुकीचे वाटप करण्यात आले असून त्या अन्वये पेट्रोलिंग करण्यात येते.

३) नाकाबंदी व पेट्रोलिंग : पोलीस स्टेशनच्या हद्दीत वेळोवेळी नाकाबंदी करण्यात येते. महिलांची वर्दळ असलेल्या ठिकाणी तसेच इतर संभाव्य ठिकाणी पेट्रोलिंग करण्यात येते. काही महत्त्वाच्या ठिकाणी लोकांना दिसतील अशा पध्दतीने पोलीस गाडया लावण्यात येतात.

४) मोबाईल ॲप : संकटात सापडलेल्या महिला अथवा इतर नागरीकांना तातकाळ मदत मिळणेकरीता आय वॉच पोलीस हे ॲप सुरु करण्यात आले आहे. या ॲपचे बटन दाबताच पोलीस नियंत्रण कक्ष आणि इतर आठ व्यक्तीना फोन जाईल आणि पोलीस नियंत्रण कक्षाला गुगल नकाशाव्दारे त्या व्यक्तीचा पत्ता लागेल तसेच फोनवर प्रतिसाद न मिळाल्यास संबंधितास एसएमएस जाईल.

सदरच्या घटना रोखण्याकरीता सन २०१४ च्या पूर्ण वर्षात सीआरपीसी १०९ खाली एकूण ८६१ जणांवर, ११० खाली १६९६ जणांवर, १५१ (३) खाली १२४ जणांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) तालुक्यात स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची स्थापना करणेबाबत

(९०) * ४०८१ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची स्थापना मौजे-दिवाणमान येथे आरक्षित असलेल्या स.नं.१५७ पै.स.न. १७६ पै. या जागेवर करण्यासाठी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी लोकप्रतिनिधीनी एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार उपप्रदेश व मीरा-भाईंदर येथील वाढत्या लोकसंख्येमुळे

कायदासुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न पाहता सदर पोलिस आयुक्तालयाची स्थापना किती कालावधीत करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही, हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक १.८.२०१४ पासून ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यात एकूण १६ पोलीस ठाणे तसेच वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जाव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड या तालुक्यांच्या समावेश करण्यात आला आहे.

अपर पोलीस अधिक्षक, वसई, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर, बोईसर व डहाणू ही पदे पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली आहेत. नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण केले तर पालघर व ठाणे जिल्ह्यात पोलीस घटकासाठी अत्यंत कमी कार्यक्षेत्र शिल्लक राहणार आहे. पालघर जिल्ह्यानिर्मितीमुळे दोन्हीही घटक मिळून संपूर्ण विभाग नियंत्रित करु शकत नसल्याने मिरारोड व वसई पोलीस आयुक्तालय निर्माण करणे उचित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामध्ये नगरपरिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकारीऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(९१) * २९२५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ कायदा अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व २२७ नगरपरिषदांमधील नगराध्यक्षाचे अधिकार मागील काही वर्षात काढून घेण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आधीच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत त्यामुळे अतिमहत्वाच्या कामांना परवानगी देतांना नगराध्यक्षांना सहया करण्याचे अधिकार नसल्यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित राहिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) त्यातच काही ठिकाणी एकाच अधिकाऱ्यांकडे तीन तीन नगरपरिषदेचा भार टाकण्यात आला असून तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे त्याचा भार तहसिलदारांकडे टाकण्यात येत आहे हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) तदनुसार उक्त पदे भरण्याबाबत तसेच नगराध्यक्षांना पूर्वीप्रमाणे अधिकार देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) होय. मुख्याधिका-याचे पद रिक्त होत असल्यास सदर पद भरेपर्यंत या पदाचा अतिरिक्त भार शक्यतो नजीकच्या मुख्याधिका-याकडे आणि काही कारणास्तव ते शक्य नसेल तर महसूल विभागाकडील सक्षम अधिका-याकडे देण्यात येतो.
(४) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) रिक्त पदे विचारात घेऊन २३ परिविक्षाधीन मुख्याधिका-यांना दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून नियमित मुख्याधिकारी पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महापालिकेच्या सफाई कामगारांना पालिकेकडून मास्क, बूट, हातमोजे व साबण पुरविण्याबाबत

(९२) * ३४१२ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना पालिकेकडून मास्क, बूट, हातमोजे व साबण पुरविण्यात आले नसल्याने महापालिकेच्या दुर्लक्षामुळे सफाई कामगार विविध रोगांनी बळी पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून बेजबाबदार मुकादम, ठेकेदार व आरोग्य विभागातील आधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

पुणे महानगरपालिकेच्या दिनांक १३.७.२००० च्या नवीन गणवेश नियमावलीनुसार सफाई सेवकांना बूट देय नसल्याने त्यांना बूटाचे वाटप करण्यात आलेले नाही.

तथापि, सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात मास्क, साबण, हातमोजे व गमबूट इत्यादी साहित्य पुरविण्यात आलेले आहे. त्यामुळे मास्क, हातमोजे व साबण न पुरविल्याने सफाई कामगार विविध रोगांना बळी पडत असल्याची बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील अंबाबाई मंदीराची व परिसराची सुरक्षा व्यवस्था वाढवण्याबाबत

(९३) * ४१५४ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतात घडत असलेल्या दहशतवादी कारवायाच्या पार्श्वभूमीवर दहशतवादी विरोधी पथकाच्या अधिकाऱ्यांनी (एटीएस) दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी कोल्हापूर येथील अंबाबाई मंदीराची व परिसराची पहाणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावेळी त्यांनी मंदिरासह परिसरात सीसीटीव्ही कॅमेराची संख्या वाढवण्याबाबत व मंदिराची सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याच्या सुचना मंदिर समितीस दिल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुचनाच्या आधारे शासनाने सदर मंदिराच्या सुरक्षेत वाढ करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दहशतवाद विरोधी पथकाच्या अधिका-यांनी दिनांक ४.१.२०१५ रोजी कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिराची व परिसराची पाहणी केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मंदिराच्या सुरक्षितेकरीता जिल्हाधिकारी, आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका व इतर अधिकारी/पदाधिकारी यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन सुरक्षा ऑडीट करण्यात येते. तसेच पोलीस कर्मचारी, खाजगी सुरक्षा रक्षक व सीसीटीव्ही कॅमे-यांच्या संख्येमध्ये वाढ करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रात टी.बी. या आजारात झालेली वाढ

(९४) * ३३९२ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रात टी.बी.च्या आजारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती व कारणे काय आहेत,

(३) तसेच, टी.बी. आणि अन्य आजारांच्या औषध उपचारांच्या किंमतीत प्रचंड वाढ झाल्यामुळे

रुग्ण उपचारांकडे दुर्लक्ष करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, टी.बी. रुग्णांची झालेली वाढ नियंत्रणात आणण्यासाठी व रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) मुंबई शहरातील क्षयरोग रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसून येत नाही. परंतु एम.डी.आर.रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. रुग्णांचे निदान करण्यासाठीच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळांच्या संख्येमध्ये वाढ त्याचप्रमाणे संशयित रुग्णांच्या चाचण्या करण्यासाठी पाठविण्याच्या निकषांमध्ये व निर्देशामध्ये मुंबईसाठी विशेष बदल केल्यामुळे एम.डी.आर.क्षयरुग्णांमध्ये वाढ झाली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात क्षयरोगाच्या आजारात लोकसंख्येच्या प्रमाणात थोडीफार वाढ झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मुंबई शहरात प्रशासकीय बळकटीकरण, क्षयरोग व औषध प्रतिरोधी क्षयरोगाच्या त्वरीत निदानासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे, प्रभावी उपचारांच्या उपलब्धतेसाठी सुधारणा करणे, संसर्ग नियंत्रण, खाजगी क्षेत्रातील आरोग्य सेवा देणाऱ्या संस्था व रुग्णांना सुविधा व सहकार्य यासाठी योजना व समन्वय, आरोग्य शिक्षण, माहिती व प्रसिध्दी, एम.डी.आर. व एक्स.डी.आर. रुग्णांना पोष्टीक आहार, आरोग्य कर्मचाऱ्यांचे नियमित सर्वेक्षण, आंतरराष्ट्रीय संस्थांचा मुंबई क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात सहभाग तसेच राज्य औषध भांडार असे विविध कार्यक्रम क्षयरोगाला आळा घालण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे राबविले जात आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या धोरणानुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पोलिसांच्या निवासस्थानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी यांच्याकरिता १ लाख घरे बांधणेबाबत

(९५) * ३१९२ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, ॲड.अनिल परब, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलिसांच्या निवासस्थानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता १ लाख घरे बांधण्यासाठी १० हजार कोटी रुपयांचा महत्वाकांक्षी प्रकल्प पोलीस गृह निर्माण विभागाने आखला असल्याचे माहे जानेवारी २०१५

मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने प्रकल्प पूर्ण करणे कठीण असून याकरिता शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यास तात्काळ हा प्रकल्प सुरु करता येईल असेही महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण मंडळामार्फत गृह सचिवांच्या बैठकीत स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी खाजगीकरणाच्या माध्यमातून वाढीव एफ.एस.आय. देवून गृह प्रकल्प राबविण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उक्त प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जादूटोणा दूर करण्याबाबत करावयाची कारवाई

(९६) * ३०५३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धर्मांमध्ये कोणीही जादूटोणा करत असेल तर त्यांच्यावर कारवाई होत असली तरी अजूनही जादूटोणा गुन्ह्यात वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ठोस कारवाई करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे वा करणार आहे,
(३) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) असे म्हणता येणार नाही.
(२) अंधश्रध्दा निर्मुलनाबाबत अध्यादेश २६ ऑगस्ट, २०१३ निर्गमित करण्यात आला असून, डिसेंबर २०१३ पर्यंत एकूण ३५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली होती. त्यापैकी ३२ गुन्हे उघडकीस आले असून एकूण ७६ आरोपीनां अटक करण्यात आली आहे.
सन २०१४ मध्ये १०७ गुन्ह्यांची नोंद असून त्यामधील १०१ गुन्हे उघडकीस आले आहेत. एकूण ३०९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. जानेवारी २०१५ मध्ये ५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

पोलीस विभागाने मोहल्ला कमिटीमध्ये तसेच इतर बैठकांमध्ये सदर कायदयाबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील रस्त्यांखालील खोदकाम करताना काढलेले पेवर ब्लॉक परत न लावता नव्याने पेवर ब्लॉकसाठी निविदा काढल्याबाबत

(९७) * ३२८८ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील रस्त्यांखालील काही कामांसाठी खोदकाम करताना त्यावरील पेवर ब्लॉक काढले जातात रस्त्याखालील काम झाल्यानंतर रस्ते किंवा पदपथ पूर्ववत न करता काढलेले पेवर ब्लॉक गायब केले जाऊन पुन्हा नव्याने पेवर ब्लॉकसाठी निविदा काढल्या जातात असे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबतीत लक्ष घालण्यासाठी काही स्वतंत्र पथकांची निर्मिती करणे या कामी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,
(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
रस्त्यांखालील कामे करतांना अस्तित्वातीलच पेव्हर ब्लॉक वापरुन दुरुस्तीची कामे करण्यात येतात. खोदाईच्या कामात जर काही पेव्हर ब्लॉक तुटलेले/खराब झालेले असतील असे पेव्हर ब्लॉक न वापरता त्या ठिकाणी नवीन पेव्हर ब्लॉक वापरण्यात येतात.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सुगाव (ता.अंबाजोगाई. जि.बीड) येथे मध्यप्रदेशातील एका उसतोड कामगार कुटुंबातील अल्पवयीन मुलीवर केलेला बलात्कार

(९८) * २६७१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुगाव (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे मध्यप्रदेशातील एका उसतोड कामगार कुटुंबातील अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास

निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोपींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, सदर प्रकरणी फीर्यादीवरुन पोलीस स्टेशन बर्दापूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड येथे दिनांक १८.०१.२०१५ रोजी गु.र.नं.६/२०१५ भा.दं.वि.कलम ३७६ (ड), ३४२, ३२३, ५०६, अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा ३(१), ११(१२), ३(२) (५) व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा ४, १८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी एकुण ७ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेविरुद्ध दिनांक १७.०२.२०१५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील कामगार उपआयुक्त कार्यालयामार्फत घरेलु कामगारांच्या करण्यात येणाऱ्या नोंदणीबाबत

(९९) * ३५३० अॅड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घरेलु कामगारांची नोंदणी करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा यासाठी महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियमानुसार १२ ऑगस्ट, २०११ रोजी महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे व पालघर जिल्ह्यातील घरेलु कामगारांची नोंदणी करण्याकरिता ठाणे शहरातील कामगार उपायुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता भासत असल्याने साडेतीन वर्षात केवळ १४ हजार कामगारांची नोंदणी करण्यात आली असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उक्त कर्मचा-यांची संख्या अपुरी असल्याने घरेलू कामगारांना नोंदणी करण्यासाठी अनेक फेऱ्या माराव्या लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, घरेलू कामगारांची तातडीने नोंदणी होण्यासाठी व आवश्यक त्या सोईसुविधा पुरविण्याबाबत तसेच उक्त कामगारांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची करणे काय आहेत?

श्री. प्रकाश मेहता : (१) होय, हे खरे आहे.
(२) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन ठाणे व पालघर असे दोन जिल्हे निर्माण करण्यात आले

असले तरीही तुर्त अविभाजित ठाणे जिल्ह्यासाठी काम करण्यात येत आहे. याकरिता कामगार उपायुक्त, ठाणे यांच्या अधिनस्त असलेल्या सहाय्यक कामगार आयुक्त, कल्याण, भिवंडी व तारापूर या कार्यालयामार्फत नोंदणीची कार्यवाही करण्यात येत असून माहे जानेवारी, २०१५ पर्यंत १५,६८८ घरेलू कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे, कामगार उपायुक्त ठाणे यांच्या कार्यालयात वरिष्ठ लिपिक, लिपिक-टंकलेखक संवर्गातील ११ पदांपैकी ५ पदे कार्यरत आहेत. तरीही परिपूर्ण अर्जासहीत आलेल्या घरेलू कामगारांची त्याच दिवशी नोंदणी करण्यात येते.
(४) घरेलू कामगार कल्याण मंडळासाठी पद निर्मितीची कार्यवाही सुरु आहे. घरेलू कामगारांची नोंदणी ही सतत सुरु राहणारी प्रक्रिया असून, असंघटीत व अशिक्षित अशा घरेलू कामगारांच्या नोंदणीसाठी त्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कामगार संघटनांना नोंदणीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची संपूर्ण कल्पना देण्यात येते. परिपूर्ण अर्जासह उपस्थित राहणाऱ्या घरेलू कामगाराची तात्काळ तपासणी करुन नोंदणी करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सातपुर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील महिला कामगाराची झालेली हत्या

(१००) * ४७८२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातपुर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील शिवाजीनगर परिसरात महिला कामगाराची दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास भरदिवसा घरात शिरुन हत्या करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विवाहित महिलेने तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराबाबत गंगापुर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करुनही तिच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे सदर हत्या झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली वा करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) शिवशक्ती चौक, शिवाजी नगर (जि.नाशिक) येथील सार्वजनिक रस्त्यावर दिनांक ०७/०१/१५ रोजी मजूर महिलेचा चाकूने खून केल्याबाबत गंगापूर पोलीस स्टेशन येथे एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल आहे.
(२) गुन्ह्यातील आरोपीने सदर महिलेच्या वडिलांना दुरध्वनीवरुन दिनांक ०९/०९/१४ रोजी धमकी दिल्याने आरोपीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी आरोपीचा शोध घेतला असता आरोपी

पळून जात असल्याने मिळून आला नव्हता.

(३) व (४) होय.

गुन्ह्याच्या तपासात पालखेड, ता.निफाड भागात आरोपीचा शोध घेतला असता आरोपीने पालखेड, ता.निफाड येथे गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे आढळून आले. त्याबाबत पिंपळगाव पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू रजिस्टर मध्ये ०३/१५ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७४ अन्वये दिनांक ०८/०१/१५ रोजी अकस्मात मृत्यूची नोंद दाखल आहे. गुन्ह्यात ॲबेट फायनल समरी मंजूर होण्याकरिता दिनांक १३/०२/१५ रोजी न्यायालयात मुळ कागदपत्रासह अहवाल पाठविण्यात आला आहे.

(५) विलंब झालेला नाही.

पुणे शहरातील सिंहगड रस्त्यावरील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने तयार केलेला रस्ता पूररेषेबाहेर बांधल्याबाबत

(१०१) * २८५२ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील सिंहगड रस्त्यावरील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्चून तयार करण्यात आलेला रस्ता पूररेषेबाहेर हलविणे तसेच सदरचा रस्ता उखडण्याकरिता लागणारा खर्चही महापालिकेने करावा असा आदेश राष्ट्रीय हरित लवादाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाच्या पहिल्या सुनावणी दरम्यान उर्वरित रस्त्याचे काम पूररेषेबाहेर करण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले असतांना महापालिकेने सदर रस्ता पूररेषेतच बांधला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेच्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे काय, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच महापालिकेला पडलेला भूर्दंड या अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) सदर रस्त्याबाबत मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्याकडे दिनांक ४.१.२०१३ रोजी पहिली सुनावणी झाली. सदर सुनावणीत दिलेल्या मनाई आदेशानंतर महानगरपालिकेने पूर रेषेत कोणतेही काम केलेले नाही.

(३) पुणे शहराच्या मंजूर विकास आराखडयामध्ये सदर रस्ता दर्शविण्यात आला असून, या रस्त्याच्या कामासाठी पुणे महानगरपालिकेने सन २००९-१० या आर्थिक वर्षात रु. ७.५० कोटी इतकी तरतूद करुन रस्त्याचे काम हाती घेण्यात आले होते. सदर रस्त्यासाठी एकूण रुपये १५ कोटी इतका खर्च झाला आहे.

सदर प्रकरणी मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४.१.२०१५ च्या आदेशाच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे झालेल्या नुकसानीबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडून तपासणी करण्यात येत आहे.

(४) वरीलप्रमाणे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडून तपासणी करण्यात येत आहे.

पुणे महापालिकेच्या अकरा अग्निशमन केंद्रातील सुमारे ४५० कर्मचारी सात वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याची बाब

(१०२) * ५६५८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या अकरा अग्निशमन केंद्रातील सुमारे ४५० कर्मचारी सात वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत पाच वर्षात अग्निशमन विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी गणवेशाचे कापड खरेदी करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या बदल्या विहित वेळेत करण्यात याव्यात तसेच त्यांना गणवेश तातडीने मिळावेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील मुख्य अग्निशमन अधिकारी, उप मुख्य अग्निशामक अधिकारी, सहाय्यक विभागीय अधिकारी, अम्ब्युलन्स अटेंडन्ट व फायर क्लब मुकादम ही पदे मध्यवर्ती अग्निशमन केंद्रामधील कायम कार्यरत पदे असल्याने या पदावरील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या नाहीत.

स्टेशन डयुटी ऑफिसर अग्निशमन उपकेंद्रामध्ये निवासी अधिकारी असून ते २४ तास सेवेत असतात. सदर अधिकाऱ्यांना केंद्राजवळील परिसराची इत्यंभूत भौगोलिक माहिती असल्याने शक्यतो त्यांच्या बदल्या करण्यात येत नाही. मात्र, सब ऑफिसर या पदावरील कर्मचाऱ्याच्या बदल्या सन २०१२ मध्ये करण्यात आलेल्या आहेत.

याशिवाय फायर इंजिन ड्रायव्हर, तांडेल, फायरमन यांच्या बदल्याबाबत नव्याने विकल्प मागविण्यात आले असून पुढील कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

(२) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडील कर्मचाऱ्यांना गणवेशाचे कापड पुरविले जात नसून गणवेश पुरविले जातात. सन २०१०-११ या वर्षामध्ये विहित कार्यपध्दतीनुसार पुरविण्यात आले आहे. तसेच सन २०११-१२, सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या तीनही वर्षी गणवेश पुरविण्यात आले नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे. सन २०१४-१५ या वर्षासाठी निविदा मागविण्यात आल्या असून, सदर कार्यवाही तातडीने महानगरपालिकेतर्फे पूर्ण करण्यात येईल.

(३) व (४) सदर प्रकरणी शासन वा पुणे महानगरपालिकेकडून चौकशी करण्यात आली नाही. मात्र उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे बदल्याबाबत तसेच गणवेश खरेदीबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेल्या गोदामावर शासनाने करावयाची कारवाई

(१०३) * ३८७९ श्री.जयंत पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील राहनाळ येथील बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेल्या मढवी कम्पाऊंड मधील लाकडाच्या वखारीला आग लागून ८ कामगारांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी तालुक्यातील पूर्णा, राहनाळ, मानकोळी, कोपर, काल्हेर, गुंदवली, बळ, कशेळी या परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर गोदाम उभारले असल्याने ही घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,
(४) तसेच, या परिसरात बेकायदेशीररित्या गोदामाची उभारणी करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीही कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे
(२), (३), (४) व (५) सदरची नमूद गांवे भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्रामध्ये असून, या क्षेत्रातील बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये बांधकाम/विकास परवानगी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत देण्यात येते. या अधिसुचित क्षेत्रामधील अद्यापपर्यंत १४७ इतक्या वाणिज्यिक वापराच्या अनधिकृत बांधकामावर (४८ गोडाऊन्स) महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कार्यवाही केली असून ५१ प्रकरणी (२७ गोडाऊन्स) सदर अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच मौजे-धामणगांव येथील १६ गाळयांच्या गोडाऊन्सचे यापूर्वी निष्कासन करण्यात आलेले आहे.

ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर शहरातील बहुतांशी लॉजिंग-बोर्डींगमध्ये अनैतिक व्यवसाय चालत असल्याबाबत

(१०४) * ३००७ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त,

डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर शहरातील बहुतांशी लॉजिंग-बोर्डींगमध्ये अनैतिक व्यवसाय चालत असताना या व्यवसायाला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अखत्यारितील उपविभागीय कार्यालयाकडून नियमबाह्य परवाने देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्याच्या मुख्य शहरातील काचेच्या इमारती धोकादायक वा घातक ठरत असल्याबाबत

(१०५) * २७३९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, उपनगरे व राज्यातील इतर महत्वाच्या शहरात गत काही वर्षात नव्याने उभ्या राहिलेल्या इमारती आकर्षित दिसण्यासाठी या इमारतींना मोठ्या प्रमाणात बाहेरून काचेच्या वापरावर भर दिला जात असल्याने, या इमारतीना लागलेली आग विझवताना दलाला शर्थीचे प्रयत्न करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधेरी मुंबई येथील लोटस पार्क इमारतीचे आग विझवतांना एका जवानाचा बळी गेल्यानंतर ही बाब अधिक प्रकर्षाने समोर आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई आणि राज्यातील एकूणच तापमानाचा विचार करता, अशा इमारतींना काचेचा वापर करतांना पर्यावरण विभागाची परवानगी घेतली जाते का,

(४) तसेच आजतागायत काचेच्या इमारतींमध्ये लागलेली आग व त्यामुळे निर्माण झालेल्या कठीण परिस्थितीचा विचार करता, अशा दुर्घटना घडू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) लोटस पार्क, अंधेरी येथील भीषण आगीचा सामना करताना एका अग्निशामकाचा मृत्यू ओढावला ही बाब खरी असली तरी, त्यास फक्त काच लावलेली इमारत ही बाब कारणीभूत नसून वाऱ्याचा वेग व वाऱ्याची बदलती दिशा, वरुन जळत खाली पडणारे व वाऱ्यामुळे त्याच इमारतीत घुसणारे जळते अल्युमिनियम कंम्पोझिट पॅनेल्स, वायू वीजनाचा (व्हेन्टिलेशन) अभाव, बाहेर पडण्याच्या मार्गातील अडथळे व विविध ठिकाणच्या अतिक्रमणामुळे आकस्मित रित्या आणिबाणीचा प्रसंग उद्भवल्यामुळे सदर घटना घडली.

(३) नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात काचेचे आवरण असलेल्या इमारतींसाठी दिनांक २८.०८.२०१३ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. त्याच स्वरुपाचे निदेश संपूर्ण राज्यामध्ये लागू करण्यात येत आहेत. तसेच यापूर्वी अस्तित्वात असलेल्या इमारतींसाठी नियम करण्याचे विचाराधीन आहे.

सोलापूर महापालिकेच्या आरोग्य निधीत झालेला गैरव्यवहार

(१०६) * ५४१४ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या रहिवाश्यांच्या आरोग्यासाठी १४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रक्कम कोणत्या बाबी करिता खर्च झाली याची नोंद महानगरपालिका प्रशासनाकडे नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महानगरपालिका रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांना सोयीसुविधा उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात महापालिकेने आरोग्य विभागाकडील दवाखाने व प्रसूतीगृहासाठी रु. ११ कोटी २८ लक्षची तरतूद केली आहे.

(२) व (३) नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषतः विदर्भात मोठया प्रमाणात अल्पवयीन मुलींना, महिलांना लग्नाचे आमीष दाखवून परराज्यात विक्री केली जात असल्याबाबत

(१०७) * ५१३३ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः विदर्भात मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुलींना, महिलांना लग्नाचे आमीष दाखवून परराज्यात विक्री करुन त्यांच्यावर अत्याचार केला जात असल्याच्या घटना घडत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, अद्याप पर्यंत किती गुन्हेगारांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) राज्यात विशेषत: विदर्भात अल्पवयीन मुलींना, महिलांना लग्नाचे आमीष दाखवून परराज्यात विक्री केली जात असल्याच्या गुन्ह्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	दाखल गुन्हे	एकूण पिडीत	तपासावरील गुन्हे	अटक आरोपी	कोर्ट प्रलंबित
२०१२	६	७	०	४२	५
२०१३	८	३२	०	४६	८
२०१४	८	९	३	४४	६
एकूण	२२	४८	३	१३२	१९

उपरोक्त नमूद २२ दाखल गुन्ह्यांमध्ये १३२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यांपैकी ३ गुन्ह्यांमध्ये पोलीस तपास सुरु आहेत. उर्वरित १९ गुन्ह्यांमध्ये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून न्यायप्रविष्ठ आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नंदुरबाळ, धुळे, नाशिक, मोखाडा व इतर आदिवासी भागात आदिवासींकरिता शबरी घरकुल योजना राबविण्याबाबत

(१०८) * ५५३० श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नंदुरबाळ, धुळे, नाशिक, मोखाडा व इतर आदिवासी भागात आदिवासींकरिता म्हाडामार्फत शबरी घरकुल योजना शासनामार्फत राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घरकुल योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) राज्यातील नंदुरबार, धुळे, नाशिक, मोखाडा व इतर आदिवासी भागात आदिवासींकरिता म्हाडामार्फत शबरी घरकुल योजना राबविण्याबाबतचा कोणताही निर्णय या विभागाच्या स्तरावर झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील प्रस्तावित स्मारकाबाबत

(१०९) * ४४१४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रस्तावित असलेल्या अरबी समुद्रातील ऐतिहासिक भव्य स्मारकाचा शुभारंभ दिनांक १९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास करण्यात येणार असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) तसेच, या स्मारकासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत का,

(४) असल्यास, किती कालावधीत उक्त प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे,

(५) अद्याप, यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील स्मारकाचे भूमीपूजन दिनांक १९ फेब्रुवारी, २०१५ रोजी करण्यास प्रयत्नशिल असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी जाहिर केले होते.

(२) आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये रुपये १०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. तसेच सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी रुपये १०० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) नाही.

(४) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे. सदरची प्रक्रिया पूर्ण होताच व्यवस्थापन सल्लागारामार्फत सविस्तर आराखडे, डिझाईन, अंदाजपत्रके इत्यादी तयार करण्यात येणार आहेत. त्यानंतर स्मारक उभारण्याच्या कामाची निविदा मागविण्यात येतील.

(५) केंद्र शासनाची मान्यता दिनांक २३.०२.२०१५ रोजी प्राप्त झाली आहे. तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे ही बाब विचारात घेता प्रस्तूत प्रकरणी विलंब झालेला नाही.

मुंबईत मेट्रो-मोनो रेल्वे, स्कायवॉक, लिंक रोड आदी महत्वपूर्ण प्रकल्पांमुळे प्रकल्पग्रस्त लोकांचे पुनर्वसन करण्याबाबत

(११०) * ३३५१ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मेट्रो-मोनो रेल्वे, स्कायवॉक, लिंक रोड आदी महत्वपूर्ण प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या ४० हजाराहून अधिक लोकांचे पुनर्वसन करण्यात आले परंतू अजूनपर्यंत साडेपाच हजार प्रकल्पग्रस्त लोकांचे पुनर्वसन झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातील साडेपाच हजार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रकरणात कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे राबविण्यात आलेल्या प्रकल्पांनी बाधित, निष्कासित आणि अंतिमत: पात्र अशा ४३६ प्रकल्पग्रस्तांचे पुनवर्सन प्रगतीपथावर असून सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांपैकी २१७४ प्रकल्पग्रस्तांचे पुनवर्सन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर लोणावळा परिसरात होत असलेल्या लुटमारीच्या घटना

(१११) * ३१७७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गावर लोणावळा परिसरातील डोंगरगाव येथील द्रुतगती महामार्गाच्या पुलावर अवघ्या १५ मिनिटांच्या कालावधीत लुटमारीच्या दोन घटना घडल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे काय, तसेच लुटमारीच्या घटनांवर आळा बसण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत,

(४) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) लोणावळा शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक २३.११.२०१४ रोजी लुटमारीच्या दोन घटना १५ मिनिटाच्या अंतराने घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) या प्रकरणी लोणावळा शहर पोलीस ठाणे येथे, गु.र.नं.१५७/२०१४, भा.दं.वि.सं.कलम ३९५, सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) प्रमाणे दिनांक २३.१.२०१४ रोजी गुन्हा दाखल केला आहे. घटनेतील ६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु. ५६,५६०/- किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर व जुने पुणे-मुंबई महामार्गावर लुटमारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त पोलीस कर्मचारी दिवसा व

रात्री शस्त्रासह पेट्रोलिंगसाठी नेमले जातात. तसेच, पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर व जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर गुन्हेग्रस्त ठिकाणी पोलीस चौक्या ठेवण्यात आलेल्या असून तेथे पोलीस कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या मार्गावर लुटमारीच्या घटना घडू नयेत याकरीता सर्वतोपरी दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील नालासोपारा सम्राट अशोक कालीन बौद्ध लेणी व स्तुपाचे अवशेष आढळून आल्याबाबत

(११२) * ४२७६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित स्वीकृत प्रश्न २३९४ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथे सन २०१० मध्ये सम्राट अशोक कालीन बौद्ध लेणी व स्तुपाचे अवशेष निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अशोक कालीन बौद्धलेणी व स्तुपाचा जिर्णोध्दार करण्यासाठी वसई-विरार महानगरपालिकेला निधी देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) सदर स्तुपाची जागा सुमारे ४ एकर असून ती संपूर्ण जागा पुरातत्व विभागाच्या ताब्यात व नियंत्रणात आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेने जिर्णोध्दारासाठी शासनाकडे निधीची मागणी केलेली नाही.

कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात डोंबिवलीच्या दावडी गावातील जमिनीच्या बनावट नोंदी केल्याबाबत

(११३) * ५६४१ श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात डोंबिवलीच्या दावडी गावातील जमिनमालक मृत असताना त्याची सुमारे २०० कोटी रुपयांची जमीन बिल्डर व काही बोगस व्यक्तींच्या नावे करण्यासाठी तलाठयांनी बनावट नोंदी केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जमिनीच्या नोंदीचे रेकॉर्डच गहाळ झाले असल्याने या कोटयावधी रुपयांच्या जमीन घोटाळयाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कोकण विभागीय आयुक्तांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या संबंधितावर शासनाने काय कारवाई केली

आहे वा करणार आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही. मौजे दावडी गावातील एका व्यक्तीच्या नावे दाखल असलेली जमीन फेरफार क्रमांक ५७५ दिनांक २०.०५.१९९४ नुसार वारसाने सदर व्यक्ती हे २० वर्षापूर्वी मयत झाल्याने तसेच त्यांना वारस मुलगा, मुलगी अथवा पत्नी असे कोणीही नसल्याने त्यांचे दोन सख्खे पुतणे यांच्या नावे वारसाने फेरफार तलाठी यांनी मंजूर केला होता. तथापि सदरच्या फेरफारानुसार गावी गाव नमुना क्र. ७/१२ सदरी अंमल दिलेला नाही.

उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी दिनांक २७.०९.२०१० रोजी सदरचा फेरफार रद्द केलेला आहे. तसेच मयत व्यक्तीच्या मिळकतीस वारस असलेबाबत अनेकांनी हक्क सांगितल्याने व दाव्यातील वारसदार यांच्याकडे मृत्यूपत्राचे प्रोबेट व वारस प्रमाणपत्र नसल्याने उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी मयत मारुती पाटील यांच्या मिळकती महाराष्ट्र शासन जमा केलेले आहे.

(२), (३) व (४) मौजे दावडी सजेतील जमिनीचे अभिलेख दिनांक ११.१२.२००९ रोजी चोरीस गेलेले होते. सदर चोरीबाबत मानपाडा पोलीस स्टेशन येथे गुरक्र. ४२१/०९ भादंवि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे १२.१२.२००९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याबाबत न्यायालयाने दिनांक २२.०२.२०१२ रोजी अ वर्गात समरी मंजूर केलेली होती.

गहाळ झालेले जमिनीचे रेकॉर्ड पुन:स्थगित करण्याबाबत मा.न्यायालयाने जनहित याचिका क्र. ५६/२०११ मध्ये विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांना आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने जमिनीचे रेकॉर्ड पुन:स्थापित करण्याकरीता उप विभागीय अधिकारी, कल्याण यांची विशेष अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे.

तथापि, चोरीस गेलेले अभिलेखांचे दोन गठ्ठे दिनांक २३.०२.२०१५ रोजी आढळून आलेले आहेत.

त्यामुळे मानपाडा पोलीस स्टेशन येथे दाखल "अ" वर्ग मंजूर झालेल्या उपरोक्त गुन्ह्याचा तपास करणे आवश्यक असल्याने न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, तिसरे न्यायालय, कल्याण यांचेकडून सदर गुन्ह्याच्या तपासाची मंजूरी घेतलेली आहे. सदर प्रकरणी अधिक तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारपट्टीला अतिरेक्यांचा धोका निर्माण झाल्याने पोलिसांची नियुक्ती करण्याबाबत

(११४) * ५७५१ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारपट्टीला अतिरेक्यांचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे

जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्याला मोठया प्रमाणात सागर किनारपट्टी लाभली असुन या मार्गाने अतिरेक्यांनी येऊन मुंबईमध्ये दहशतवादी हल्लेही केले असल्याने सदरहू किनाऱ्यावर रात्रपाळीला गस्त घालण्याकरिता पोलिसांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) रायगड जिल्ह्याला लाभलेल्या १२२ कि.मी. सागर किनारपट्टीच्या सुरक्षिततेसाठी केंद्र शासनातर्फे ५ व राज्य शासनातर्फे ६ अशा ११ नोकांमार्फत रात्री गस्त करण्यात येत आहे. शिवाय सर्व सागरी किनारी पोलीस ठाण्यांकडे सागरी किनारा गस्तीसाठी जीप पुरविण्यात आलेल्या असून उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली नियमित रात्री गस्त केली जाते. संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी हे त्यांच्या विभागातून दररोज १ पोलीस अधिकारी व ३ पोलीस कर्मचारी गस्तीसाठी नेमतात व रात्री गस्ती दरम्यान संशयीत वाहनाची व इसमांची तपासणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.